CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २४० | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### पुणे विमानतळावर प्रवाशांचा खोळंबा

**पुणे :** पुण्यातील विमानतळावर इंडिगोची विमानसेवा खोळंबली आणि त्याचा मनस्ताप अनेक प्रवाशांना सहन करावा लागत आहे. आता तर अनेक प्रवासी आपलं तिकीट कॅन्सल करण्यासाठी तिकीट काउंटर वर झालेली पहिला मिळत आहे. रात्री पासून अनेक प्रवासी पुणे विमानतळाच्या बाहेर आणि आत थांबून आहे. दहा ते बारा तास काही प्रवासी थांबले आहेत. मात्र कोणतीही ठोस माहिती प्रवाशांना दिली जात नाही आहे. इंडिगोच्या चेकिंग काऊंटरवर मोठ्या प्रमाणात प्रवासी थांबले पाहायला मिळत आहे.

### राज्य निवडणूक आयोगाला कोर्टानं झापलं

**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला धारेवर धरले आहे. नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुका अखेरच्या क्षणी लांबणीवर टाकल्याच्या आयोगाच्या निर्णयावर खंडपीठाने तीव्र नापसंती व्यक्त केली. न्या. कंकणवाडी आणि हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठापुढे या प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायालयाने स्पष्ट केले की, ऐनवेळी निवडणुका लांबणीवर टाकण्याचा हा निर्णय टाळता येण्यासारखा होता आणि झालेला निर्णय योग्य नव्हता. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने या कृतीबद्दल नाराजी व्यक्त केली. यामुळे निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### हिवाळी अधिवेशनावर मोर्चांचे सावट

**नागपूर :** नागपूर येथील हिवाळी अधिवेशन २०२५ मध्ये महाराष्ट्र विधानमंडळावर ३३ हून अधिक मोर्चे आणि आंदोलने धडकणार असल्याची माहिती समोर आली आहे. नागपूर येथे ८ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या या अधिवेशनासाठी विविध संघटनांनी तयारी पूर्ण केली आहे. प्राप्त माहितीनुसार, ३३ आंदोलन करणाऱ्या संघटनांनी पोलिसांकडे परवानग्या मागितल्या आहेत. यामध्ये २२ संघटनांनी धरणे आंदोलन करण्याची परवानगी मागितली आहे, तर १७ संघटनांनी साखळी उपोषणासाठी अर्ज केला आहे. दिंडोरा बॅरेज प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती तसेच चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा संघर्ष समिती यांसारख्या प्रमुख संघटनांनी मोर्चा काढण्याची परवानगी मागितली आहे.

### बिबट्याच्या हल्ल्यात तरुण जखमी

**नारायणगाव :** नारायणगाव–जुन्नर रस्त्यालगत साकार नगरी सोसायटीजवळ रात्री सव्वा आठ वाजता १८ वर्षीय तनिष नवनाथ परदेशी या तरुणावर बिबट्याने हल्ला केला. रात्रीच्या अंधारात मोबाईलवर बोलत उभा असताना बिबट्याच्या नख्या पोटरीवर ओरखडल्याने तो जखमी झाला, नशीब बलवंतर म्हणून तो हल्ल्यातून बचावला आहे. तनिषला नारायणगाव ग्रामीण रुणालयात दाखल करण्यात आले आहे असून त्याची प्रकृती स्थिर आहे. गेल्या काही दिवसामध्ये जुन्नर तालुक्यात बिबट्यांच्या हल्ल्यांची संख्या वाढली असून शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचं वातावरण आहे, पूर्वीच्या ओतूर, शेटेवाडी व शिवनेरीसारख्या घटनांमुळे वन्यजीव–मानव संघर्ष तीव्र झाला.

# नरेंद्र मोदी दबावात येणारे नेते नाहीत

## भारताला त्यांचा अभिमान असला पाहिजे, व्लादिमीर पुतिनकडून मोदींचं कौतुक



**भारत रशिया सहकार्य आणि ऐतिहासिक संबंध : पुतीन**

भारत आणि रशिया यांच्यातील सहकार्याची व्याप्ती मोठी आहे. दोन्ही देशांमधील ऐतिहासिक संबंध देखील त्यांनी अधोरेखित केलं. भारतानं स्वातंत्र्यानंतर केलेल्या प्रगतीचं पुतिन यांनी कौतुक केलं. स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांच्या कमी वेळात भारतानं अद्भूत विकास केल्याचं पुतिन म्हणाले.

**मॉस्को :** रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात भारत आणि रशिया यांच्यातील विविध सामंजस्य करारावर स्वाक्षरी दोन्ही देशांच्या प्रमुखांकडून केली जाऊ शकते. व्लादिमीर पुतिन यांना अमेरिकेनं भारतावर लादलेल्या टॅरिफ संदर्भात विचारण्यात आलं होतं. त्याबाबत पुतिन यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी दबावात येणारे नेते नाहीत, असं ते म्हणाले. अमेरिका टॅरिफच्या माध्यमातून दबाव टाकतेय, का असा प्रश्न पुतिन यांना विचारण्यात आला होता.

भारत दौऱ्यावर येण्यापूर्वी व्लादिमीर पुतिन यांनी इंडिया टुडेला मुलाखत दिली. या मुलाखतीत पुतिन यांना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबतची द्वीपक्षीय चर्चा आणि भारत– रशियाच्या संबंधांचे भविष्य याबाबत प्रश्न विचारण्यात आले.

या मुलाखतीत पुतिन यांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचं कौतुक केलं. जगानं भारताचं ठाम धोरण पाहिलं आहे. देशाला आपल्या नेतृत्त्वावर अभिमान असला पाहिजे, असं पुतिन म्हणाले. पुतिन यांनी हे देखील सांगितलं की भारत आणि रशियातील ९० टक्क्यांहून अधिक द्वीपक्षीय व्यवहार यशस्वीपणे पूर्ण झाले आहेत.

व्लादिमीर पुतिन यांनी त्यांचे मित्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्यासाठी भारताचा दौरा करत असल्यानं आनंद असल्यचं म्हटलं. पुढील बैठक भारतात आयोजित करण्यास दोन्ही नेत्यांची सहमती असल्याचं देखील त्यांनी सांगितलं.

व्लादिमीर पुतिन यांनी नऊ वेळा भारताचा दौरा केला आहे. त्यापैकी नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात तीनवेळा (२०१६,२०१८ आणि २०२१) पुतिन भारतात आले. डिसेंबरमध्ये हा त्यांचा दहावा दौरा असेल. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी सातवेळा रशियाच्या दौऱ्यावर गेले आहेत.

# अनाथ आरक्षणामुळे ८०० हून अधिक मुले झाली ‘स्वनाथ’

**सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्त मुख्यमंत्री फडणवीसांनी अनाथ मुलांशी साधला संवाद**

**मुंबई :** लहान वयात आई–वडिलांचे छत्र हरपलेल्या मुलांच्या नशीबात अतिशय हालखीचे दिवस येतात. शिक्षण आणि रोजगार दूरच, ही मुले कायमस्वरुपी प्रवाहाबाहेर फेकली जातात. ही बाब गंभीरपणे विचारात घेऊन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. १७ जानेवारी २०१८ रोजी अनाथांना शिक्षण आणि नोकरीत एक टक्का समांतर आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला. असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले. या ऐतिहासिक निर्णयामुळे आतापर्यंत ८०० हून अधिक अनाथ मुले शासकीय सेवेत दाखल झाली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी आपल्या तिसऱ्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळाची पहिली वर्षपूर्ती अनाथ मुलांसोबत साजरी करत, त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला.

यानिमित्ताने वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी ‘कृतज्ञतेचा आनंद’ हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. राज्यभरातून आलेल्या अनाथ लाभार्थी मुलामुलींसोबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी जवळून संवाद साधला. या प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, मुख्यमंत्रीपदाची तिसऱ्यांदा शपथ घेऊन आज एक वर्ष पूर्ण झाले. वर्षपूर्तीच्या निमित्ताने अनेक चांगले कार्यक्रम आयोजित केले, पण सगळ्यात जास्त आनंद या मुलांसोबत साजरा करताना येतोय. निःशब्द भाव खूप काही बोलून जातो. कार्यातून समाजपरिवर्तन घडवणे, हेच खरे समाधान आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

**बाबासाहेबांच्या तत्त्वावर आधारित निर्णय**

मुख्यमंत्री म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संधीची समानता या तत्त्वावर आधारित हा ऐतिहासिक निर्णय आहे. या एका निर्णयामुळे आज ८०० हून अधिक अनाथ तरुण–तरुणी शासकीय सेवेत दाखल झाले आहेत. हे सामाजिक न्यायाच्या दिशेने उचललेलं अत्यंत महत्त्वाचं पाऊल आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दाखला देत ते म्हणाले, व्यक्तीपेक्षा तिचं कार्य जास्त काळ जिवंत राहतं. या दोन्ही महापुरुषांनी आपल्या कर्तृत्वाने कायमस्वरूपी वारसा निर्माण केला. आपणही आपल्या कामातून अशी वारसा उभा करूया, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला उपस्थित अनाथ लाभार्थ्यांनी आपल्या यशोगाथा आणि संघर्षकथा मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या. अनेकांनी ही योजना आपल्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरल्याचे सांगितले. यावेळी तर्पण फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आमदार श्रीकांत भारतीय, भाजपाचे प्रवक्ते अजित चव्हाण उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेवटी सर्वांना शुभेच्छा देत, अनाथ मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. समाजाने आपल्याला खूप काही दिले आहे. ते समाजालाच परत करणे, हे खरे उत्तरदायित्व आहे. अनाथांसाठी सहवेदना, संवेदनशीलता आणि सातत्याने योगदान द्या. थांबू नका, सतत पुढे जात राहा, असेही त्यांनी सांगितले.




**मुंबई :** सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अनाथ आरक्षणाच्या युवा लाभार्थ्यांसोबत ‘कृतज्ञतेचा आनंद’ संवाद. २०१८ साली सरकारने समानतेच्या संधीची जी बीजे रुजवली त्याला लागलेली यश–सन्मानाची फळे म्हणजे या महत्त्वाकांक्षी तरुणांच्या यशोगाथा. त्यांच्यासह एक छायाचित्र.

# वरळीत भाजप–ठाकरे गटाचे कार्यकर्ते भिडले


*__मुंबई :__ मुंबईत भाजप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्तांमध्ये तुफान राडा झाल्याची घटना घडली आहे. कामगार युनियनवरून या दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते भिडले असल्याचे समोर आले आहे. वरळी परिसरातील हॉटेल सेंट रेजिस मध्ये दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला. गेल्या अनेक वर्षांपासून या हॉटेलमध्ये शिवसेना ठाकरे गटाची यूनियन कार्यरत आहे. मात्र भाजपकडून याच हॉटेलमध्ये पुन्हा भाजपची युनियन बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला. याला विरोध करताना शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाले. त्यामुळे मोठा राडा झाला. सध्या हॉटेलच्या परिसरामध्ये पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण अध्यक्ष म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर त्यांनी मुंबईतील शिवसेना ठाकरे गटाचे कामगार फोडण्याचा प्रयत्न केला आहे. विमानतळ आणि मुंबईतील पंचतारांकित हॉटेलमधील कामगारांचा समावेश आहे.*

# अभिनेते दळवींना शिर्डी संस्थानकडून मदत

**मुंबई :** १९७७ साली प्रदर्शित झालेल्या ‘शिर्डी के साईबाबा’ या चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते सुधीर दळवी यांनी साईबाबांची भूमिका साकारली होती. हा चित्रपट तेव्हाच्या आणि नंतर आलेल्या पिढ्यांनाही प्रेरणा देणारा ठरला.

८६ वर्षीय सुधीर दळवी सध्या एका दुर्धर आजाराने ग्रस्त असून ते ऑक्टोबर महिन्यापासून मुंबईच्या लीलावती रुग्णालयात उपचार घेत आहेत. मात्र उपचारासाठी पैसे नसल्याने त्यांच्या कुटुंबियांसमोर अडचणींचा डोंगर उभा राहिला होता. मात्र आता मुंबई उच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे त्यांना शिर्डी संस्थानाकडून ११ लाख रुपयांची मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अभिनेते सुधीर दळवी यांना आर्थिक अडचण असल्याचे लक्षात येताच श्री साई बाबा संस्थान ट्रस्टने (शिर्डी) त्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला.



यासाठी संस्थेच्या वतीने नियमात बदल करून त्यांना मदत करण्यासाठी प्रतिज्ञापत्र दाखल केले. यावर झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने ११ लाख रुपयांची मदत देण्यास हिरवा झेंडा दाखवला.

न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि हितेन एस वेणेगावकर यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत म्हटले, लोकांची श्रद्धा आणि ज्येष्ठ अभिनेत्याने साकारलेली भूमिका पाहता. ट्रस्ट त्यांना आर्थिक मदत देऊ शकते. श्री साई बाबांनी आयुष्यभर इतरांना मदत केली होती.

त्यांच्या आयुष्याचा सार पाहता ही मदत योग्य आहे. खंडपीठाने म्हटले की, ज्येष्ठ अभिनेते सुधीर दळवी यांना आर्थिक मदत हवी असल्याची माहिती समोर आली.

त्यांच्या उपचारासाठी ११ लाख रुपये देण्यास आम्ही संस्थेला परवानगी देण्यात आली असून श्री साई बाबा संस्थान ट्रस्ट (शिर्डी), कायदा २००४ च्या कलम १७ (२) (२) (ओ) च्या तरतुदीनुसार ही मदत मानवी कल्याणाच्या उद्देशाने देण्यात येत असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

# मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार!

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रात पहिल्यांदाच नगरपंचायत आणि नगर परिषद निवडणुकीमध्ये अभुतपूर्व गोंधळ दिसून आला. एकीकडे दुबार मतदार आणि आरक्षण मर्यादेमुळे निवडणूक वादात राहिली. त्यातच ऐन मतदानाच्या दिवशी नागपूर खंडपीठाने नगरपरिषदेची मतमोजणीही २१ डिसेंबर रोजी घेण्याचा निर्णय दिला. नागपूर खंडपीठाच्या निर्णयाला सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले होते. त्यानंतर आज सुप्रीम कोर्टातून मोठी अपडेट समोर आली आहे.



**उच्च न्यायालयाच्या निकालावर आता सर्वोच्च न्यायालयाचेही शिक्कामोर्तब**

महाराष्ट्रातील नगर पंचायत आणि नगर परिषद निवडणुकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. नागपूर खंडपीठाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकी संदर्भात २ डिसेंबरला पार पडलेल्या निवडणुकीचा निकाल आणि २० डिसेंबरला होणाऱ्या निवडणुकीचा निकाल एकत्रित २१ डिसेंबराला देण्याचा निर्णय दिला होता. २ डिसेंबर रोजी झालेल्या मत मोजणीनंतर थेट २१ डिसेंबर रोजीच निकाल लागणार असल्याने अनेक उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली होती. मतमोजणी तातडीने घ्याव्यात अशी मागणी करण्यात येत होती. मात्र, नागपूर खंडपीठाच्या निकालानंतर राज्य निवडणूक आयोगाने मतमोजणी २१ डिसेंबर रोजीच घेणार असल्याचे जाहीर केले.

या निर्णयाविरोधात सुप्रीम कोर्टात दाखल झालेल्या याचिकेवर आज सुनावणी झाली. सुप्रीम कोर्टाने नागपूर खंडपीठाचा आदेश कायम ठेवला आहे. नगर परिषद, नगर पालिका निवडणुकीची मतमोजणी २१ डिसेंबर रोजीच होणार आहे.

**सुप्रीम कोर्टाचे महत्त्वाचे निर्देश**

सुप्रीम कोर्टाने सुनावणी करताना मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाचा निकाल कायम ठेवला. त्याच वेळी कोणत्याही परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ आधी पूर्ण करण्याचे निर्देश दिले. हायकोर्टातील याचिकांमुळे निवडणूक कार्यक्रमांवर कोणताही परिणाम होता कामा नये, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणीदेखील सुप्रीम कोर्टाने आजच्या सुनावणीत केली.

**२४ नगर परिषदांच्या निवडणुका २० डिसेंबर रोजी**

सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि ७६ नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १५४ सदस्यपदांच्या जागांसाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी आता २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# शिक्षक संघटनांचे शाळा बंद आंदोलन यशस्वी

**त.भा. वृत्तसेवा**

**हिंगोली :** राज्यातील सर्व शिक्षक संघटनांच्या समन्वयाने ५ डिसेंबर रोजी राज्यात शाळा बंद आंदोलन करण्यात आले. हिंगोली जिल्ह्यात देखील मोठ्या प्रमाणात शाळा बंद ठेवून आंदोलन यशस्वी करण्यात आले.



शिक्षकांना टीईटी परीक्षा देण्याचा घेतलेला निर्णय मागे घ्यावा, अन्यायकारक संचमान्यता, रद्द करून यासाठी विद्यार्थी पट संख्येची अट शिथिल करावी,अंशतः अनुदानित या सह सर्वच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांना जुनी पेन्शन लागू करावी, शिक्षकेतर कर्मचारी यांना आश्वाशीत प्रगती योजना लागू करावी, स्वयंम अर्थसहाय्यीत शाळांना मान्यता देणे बंद करून मराठी शाळा वाचवाव्यात, शिक्षण विभागातील सर्व शिक्षक शिक्षकेतर रिक्त पदे तात्काळ भरावीत, सरसकट पदवीधर वेतनश्रेणी, वस्तीशाळा शिक्षकांची मागील सेवा गृहीत धरून त्यांना कायम करावे यासह अन्य प्रमुख मागण्या आहेत. मात्र सध्या ज्वलंत असलेले दोन प्रश्न सर्वांसाठी महत्वाचे आहेत.

शिक्षक पात्रता चाचणी उत्तीर्ण होणे अनिवार्य करून शिक्षकांना अडचणीत आणले जात आहे. भविष्यात या सक्तीने नोकरीमुक्त केले जाईल, अन्यायकारक संचमान्यतेच्या आडून शाळा शिक्षक अतिरिक्त ठरवून त्यांना डिसेंबर अखेरपर्यंत इतर जिल्ह्यात समायोजित करण्याचा डाव आखला जात आहे. दुसरीकडे दहा ते वीस पटाच्या आतील शाळेवर खाजगी कंपनीमार्फत कंत्राटी शिक्षक भरण्याचे नियोजन सुरू आहे. त्यातून सुद्धा शेकडो शिक्षक अतिरिक्त ठरतील. या सर्वांचे समायोजन करण्यासाठी जागाच उपलब्ध नसतील तर शेवटी कंटाळून त्याने नोकरीचा राजीनामा द्यावा. परिणामतः भविष्यात सर्व मराठी शाळा बंद पडतील हा धोका आहे. सर्व शिक्षक व शिक्षकेतर संघटना या आंदोलनात सोबत येणार आहेत.

हिंगोली जिल्ह्यासह राज्यातील संपूर्ण शाळा ५ डिसेंबरला बंद केल्याशिवाय पर्याय नाही असे ठरवून शिक्षक समन्वय समितीने जिल्हा बंद पुकारला होता . जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवेदन मुख्यमंत्री व शिक्षण मंत्री यांना पाठवण्यात आले.

या निवेदनावर जिल्हा मुख्याध्यापक संघासह शिक्षक सेना, शिक्षक भारती, स्वाभिमानी शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, मराठवाडा शिक्षक संघ, महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषद, जुनी पेन्शन संघटना आदीसह सर्व शिक्षक संघटनांच्या समन्वय समितीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लव्ह ट्रँगलमधून हळदीच्या दिवशीच आत्महत्या

**सोलापूर :** सोलापूरमध्ये घडलेल्या एका धक्कादायक घटनेनं शहरासह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. तृतीयपंथी प्रकाश उर्फ स्विटी कोळी (वय २२) हिने प्रेमात धोका मिळाला असल्याचं सांगत आपलं जीवन संपवलं. स्विटीने आत्महत्या करण्यापूर्वी एक व्हिडिओ बनवला होता. या व्हिडिओमध्ये तिने सुजित जमादार नावाच्या तरुणाचा उल्लेख केला होता. स्विटीने टोकाचं पाऊल उचलल्यानंतर आता खळबळ उडाल्याचं पहायला मिळतंय.



प्रकाशचे सुजित जमादार याच्याशी प्रेमसंबंध होते पण दोघांच्या नात्यात दुरावा निर्माण झाला. सुजितला एका तरुणीवर जीव जडला आणि सुजितने प्रकाशशी लग्नही केलं होतं. आठ वर्षांपासून प्रकाश आणि स्विटी पती–पत्नीसारखे एकत्र राहत होते. मात्र, सुजित जमादार आता दुसरे लग्न करण्याचा विचार करत होता. प्रियकराने दिलेल्या या धक्क्यातून स्विटी सावरू शकली नाही आणि तिने सुजितच्या हळदीच्या दिवशी स्वत:ला संपवलं.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नोंदणी व मुद्रांक विभागात नवीन पदे मंजूर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ डिसेंबर :** नोंदणी व मुद्रांक विभागाच्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी देणारा शासन निर्णय महसूल व वन विभागाने जारी केला आहे. यामुळे विभागात नवीन ९६५ पदांच्या निर्मितीने मंजूर पदांची संख्या वाढून ३ हजार ९५२ झाली असल्याची माहिती नोंदणी महानिरीक्षक रविंद्र बिनवडे यांनी दिली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशांची अंमलबजावणी करत मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागामध्ये ९६५ नवीन पदांची निर्मिती करून एकूण ३ हजार ९५२ पदांचा नवा आकृतीबंध ४ डिसेंबर २०२५ रोजी महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आला आहे. यात विद्यमान ३,०९४ मंजूर पदांपैकी १०७ पदे रद्द करण्यात आली आहेत. नवीन दुय्यम निबंधक कार्यालयांची निर्मिती, दस्त संख्येत झालेली वाढ आणि वाढलेली कामकाजाची व्याप्ती लक्षात घेता अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी यासाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले होते. सुधारित आकृतीबंध विभाग अधिक सक्षम, कार्यक्षम आणि बळकट करण्यास उपयुकत ठरणार आहे. पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध झाल्यामुळे शासनाकडून दरवर्षी दिल्या जाणाऱ्या इष्टांकपूर्तीत सहाय्य होऊन राज्य महसूल वाढीस चालना मिळेल.



# राज्यस्तरीय योगा स्पर्धेत दुर्गा, ओम सेलूकर भावंडांची उत्तुंग भरारी

## तपसे चिंचोलीच्या शेतकरी कुटुंबातील मुलांचे राज्यस्तरावर यश

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ डिसेंबर :** औसा तालुक्यातील तपसे चिंचोली या छोट्याशा गावातील दोन भावंडांनी योग क्षेत्रात राज्यपातळीवर आपले वेगळेपण ठसवले आहे. प्रगतशील शेतकरी प्रशांत गंगाधर सेलूकर आणि वैशाली सेलूकर यांची मुले कुमारी दुर्गा सेलूकर आणि ओम सेलूकर यांनी विविध राज्यस्तरीय व विभागीय योगा स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण विजय संपादन करत संपूर्ण गावपरिसराचा गौरव वाढवला आहे.

योग साधनेतील सातत्य आणि प्रामाणिकतेमुळेचं दुर्गा व ओम या दोन्ही भावंडांना बालपणापासूनच योगाची आवड, नियमित सराव, शिस्तबद्ध दिनचर्या आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे त्यांच्या कामगिरीत सातत्याने गुणवत्ता वाढत गेली. दुर्गा सेलूकर ही ट्रॅडिशनल योगासनासह आर्टिस्टिक सिंगल,आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक, रिदमिक जिम्नॅस्टिकची उत्तम खेळाडू आहे. तर ओम सेलूकर ट्रॅडिशनल योगासनासह आर्टिस्टिक सिंगल, कराटेमध्येही राज्यस्तरीय गोल्ड मेडलिस्ट आहे.




कुमारी दुर्गा सेलूकर हिने १७ वर्षांखालील गटात अनेक प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये आघाडी घेत उल्लेखनीय लवचिकता, संतुलन व नियंत्रणाचे प्रदर्शन केले आहे. ओम सेलूकर ने १९ वर्ष वयोगटात दमदार योगासने, प्राणायामातील प्रावीण्य आणि तांत्रिक अचूकता दाखवून परीक्षकांची वाहवा मिळवली आहे. दुर्गा ही लातूर येथील श्री श्री रविशंकर स्कुलमध्ये नववीत शिकते, तर ओम हा संत नामदेव महाविद्यालय बारावीत शिक्षण घेत असून जवळपास २१ गोल्ड मेडल आणि १५ ट्रॉफी यांनी मिळवल्या आहेत.

**पालकांचे योगदान आणि प्रेरणा**

प्रशांत आणि वैशाली सेलूकर यांनी मुलांना शिक्षणाबरोबरच खेळ आणि योगामध्येही प्रोत्साहन दिले. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळे आज दुर्गा व ओम राज्यस्तरीय व्यासपीठावर ठामपणे उभे आहेत. पालकांच्या मते, योगामुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास झाला असून त्यांच्यातील एकाग्रता, आत्मविश्र्वास आणि शिस्त या गुणांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यश संपादन केल्यानंतर आता दोन्ही भावंडांचे लक्ष राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांकडे आहे. उत्तम तयारी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर राष्ट्रीय स्पर्धेतही उत्तम यश मिळवण्याचा त्यांचा निर्धार आहे. स्थानिक पातळीवरील विविध संस्था, शाळा आणि ग्रामपंचायत यांनीही दुर्गा व ओम यांच्या कामगिरीबद्दल अभिमान व्यक्त केला आहे.

दुर्गा आणि ओम यास आशा झुंजे पाटील, सागर खरे, विश्र्वजित कुंभार यांचे मार्गदर्शन होत असून चिंचोलीसारख्या ग्रामीण भागातून राज्यस्तरीय स्पर्धांपर्यंत पोहोचणे हीच मोठी उपलब्धी असून त्यातही सलग उत्कृष्ट कामगिरीने या दोन्ही भावंडांनी गावाचे नाव उंचावले आहे. ग्रामस्थ, शिक्षक, योगप्रशिक्षक व मित्रपरिवार यांच्या शुभेच्छांचा वर्षाव सध्या सेलूकर कुटुंबावर होत आहे.

## विलासराव देशमुख फाउंडेशन स्कूल ऑफ फार्मसी येथे स्वागत समारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ डिसेंबर :** विलासराव देशमुख फाउंडेशन स्कूल ऑफ फार्मसी, लातूर येथे २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आयोजित इंडक्शन व स्वागत समारंभ दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजी उत्साही वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पंजाबराव खानसोळे, उपायुक्त, लातूर शहर महानगरपालिका हे उपस्थित होते. त्यांनी नवीन विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रातील करिअरच्या संधी, उद्योगातील बदलते ट्रेंड, संशोधनाच्या दिशा आणि उच्च शिक्षणाच्या संधी याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. वाकुरे यांनी सर्व नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करून अभ्यासक्रम रचना, परीक्षा पद्धती, महाविद्यालयाची उज्ज्वल शैक्षणिक परंपरा तसेच देश-विदेशातील रोजगार व संशोधनाच्या संधी यांची माहिती दिली. यानंतर विविध



विभागांचे प्रमुख व शैक्षणिक समित्यांचे समन्वयक यांनी त्यांच्या विभागांची सादरीकरणे सादर करून विद्यार्थी-पालकांना संस्था कार्यप्रणालीची ओळख करून दिली.

या इंडक्शन कार्यक्रमास सर्व नवप्रवेशित विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना सर्व प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रीडा विभाग, डिजिटल क्लासरूम तसेच संपूर्ण कॅम्पसची भेट देण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष आ. अमित देशमुख तसेच संस्थेचे विश्वस्त यांनी सर्व नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे नियोजन आणि यशस्वी पार पडण्यासाठी डॉ. मोहिनी साळुंके, प्रा. पुरी राणी, प्रा. अस्मिता टिगोटे, प्रा. अपर्णा सूर्यवंशी तसेच सर्व शिक्षकवर्ग आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## पॅथॉलॉजी संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. उमेश कानडे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ डिसेंबर :** येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे उपअधिष्ठाता डॉ. उमेश कानडे यांची महाराष्ट्र राज्य पॅथॉलॉजी संघटनेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



लातूर आयएमएचे माजी अध्यक्ष-पदाधिकारी राहिलेल्या डॉ. उमेश कानडे यांचे वैद्यकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रातही महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. आपल्या या निवडीनंतर समाधान व्यक्त करून डॉ. कानडे यांनी कार्यशाळा, विविध उपक्रमांद्वारे पॅथॉलॉजीतील अद्यावत ज्ञान - तंत्रज्ञानाची माहिती वैद्यकीय क्षेत्रात पोहचविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. ज्यामुळे आजराचे निदान लवकर होण्याकामी मोलाची मदत मिळणार आहे. त्यांच्या आजपर्यंतच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन संघटनेच्या राज्याच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनीही डॉ. कानडे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## पन्नालाल सुराणा यांचे विचार जतन करावे : प्रा. नागोराव कुंभार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ डिसेंबर :** देशातील आजच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक कलुषित वातावरणातून बाहेर येण्यासाठी समाजवादी विचारवंत पन्नालालजी सुराणा यांच्या विचारांचा समृद्ध वारसा आपणास जतन करावा लागेल. अशा शब्दात विचारशलाकाचे संपादक प्रा. नागोराव कुंभार यांनी पन्नालाल सुराणा यांना श्रद्धांजली वाहिली.

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, राष्ट्र सेवा दलाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष पन्नालाल सुराणा यांच्या निधनाबद्दल राष्ट्र सेवा दल, बाबासाहेब परांजपे फाउंडेशन, अंनिस, मराठवाडा जनता विकास परिषद, छात्र भारती, आंतर भारती, सोशालिस्ट फ्रंट व विविध समविचारी संघटनाच्या वतीने लातूर येथील बाबासाहेब परांजपे फाउंडेशन वाचनालय येथे ४ डिसेंबर रोजी आयोजित श्रद्धांजली सभेत मान्यवरांनी श्रद्धांजली वाहिली. त्यावेळी प्रा. नागोराव कुंभार हे बोलत होते. पन्नालाल सुराणा चालते फिरते प्रबोधनाचे एक विद्यापीठच होते. सातत्याने ते कार्यकर्त्यांशी संवाद करायचे. समाजाला, कार्यकर्त्याला, चळवळीला त्यांनी वैचारिक बळ दिले.

प्रारंभी पन्नालाल सुराणा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थितानी उभे राहून श्रद्धांजली वाहिली. व्यासपीठावर प्रा. नागोराव कुंभार, प्राचार्य सोमनाथ रोडे, ॲड. धनंजय पाटील, बी. आर. पाटील आदींची उपस्थिती होती.




यावेळी प्राचार्य सोमनाथ रोडे म्हणाले, पन्नालाल भाऊ अहंकार शून्य आणि कर्मयोग्याप्रमाणे जीवन जगले, सर्व पक्षात त्यांचे चाहते आहेत. भूकंपानंतर त्यांनी आपलं घर चे त्यांनी आवाहन स्वीकारले, हजारो अनाथ विद्यार्थ्यांचा ते नाथ बनले. समाजवाद, परिवर्तनाचा त्यांनी ध्यास घेतला होता. आलिशान हॉटेल मध्ये न राहता ते कार्यकर्त्यांच्या घरी राहायचे. त्यांनी उभे केलेले आपलं घर कधी उघडे पडू नये याचे आवाहन आपण स्वीकारणे हीच खरी श्रद्धांजली त्यांना ठरेल. तर ॲड. धनंजय पाटील यांनी पन्नालाल भाऊंच्या सहवासात राहिलेल्या आठवणी सांगून साधी राहणी आणि उच्च विचारसरणी कशी होती. ते सांगितले. तर भाऊ ध्येयवादी कसे होते, त्यांच्या कार्याचा प्रभाव माझ्यावर कसा झाला.याबद्दल छात्रभारतीचे माजी प्रदेशाध्यक्ष प्रा. अर्जुन जाधव यांनी सांगितले. तसेच अशोक गोविंदपूरकर, अतुल देऊळगावकर, सूर्यप्रकाश धुत, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, मराठवाडा विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव नरहरे, विजय चव्हाण, शेकापचे उदय गवारे, बाबासाहेब परांजपे फाउंडेशनचे बी. आर. पाटील, सुनीता आरळीकर, शिवाजीराव शिंदे, रामानुज रादंड, डॉ. गणेश गोमारे, रामकुमार रायवाडीकर, प्रा. सुभाष भिंगे, प्रा. शिवाजी जवळगेकर, कॉ. विश्वंभर भोसले, रामराजे आत्राम, निशिकांत देशपांडे, अंनिसचे दशरथ भिसे, रुकसाना मुल्ला, हरदास तंमेवार, अनिल दरेकर, वकील संघांचे ॲड.वसंतराव उगले, शिवाजी कांबळे, ॲड. प्रदीप पाटील, शाम जैन, एल. बी. आवळे, समीर पडवळ, प्राचार्य बालाजी साळुंके, प्रा. दत्ता सोमवंशी, सुभाष निंबाळकर आदिसह अनेक मान्यवरांनी पन्नालाल भाऊंसोबतच्या आठवणी सांगून श्रद्धांजली अर्पण केली.

## आ. देशमुख यांनी निवासस्थानी साधला नागरिकांशी संवाद



**त.भा. वृत्तसेवा,**


**लातूर, ५ डिसेंबर :** राज्याचे माजी मंत्री तथा आ. अमित देशमुख यांनी शुक्रवार दि.०५ डिसेंबर रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्थाचे पदाधिकारी, कॉंग्रेस पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक महिला भगिनी यांच्या भेटी घेत त्यांच्या अडीअडचणी तसेच समस्या समजून घेतल्या. यासोबतच निवेदन व निमंत्रनाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमीटिचे अध्यक्ष- ॲड. किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हा. चेअरमन ॲड.समद पटेल, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती-ललितभाई शहा, माजी उपसभापती-मनोज पाटील, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख,लातूर तालुका कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष- उमेश बेद्रे, कृष्णा बांगड, सुपर्ण जगताप, रवींद्र डोंगरे, गोविंद देशमुख, जहीर शेख, दगडूआप्पा मिटकरी, रमाकांत गडदे, हनमंत पवार, अविनाश देशमुख, अनिल पाटील, रमेश आडसकर, प्रवीण सूर्यवंशी, गौस शेख, दिलीप गायकवाड, सिकंदर पटेल, लायक पटेल, राजकुमार कत्ते, ॲड.गणेश कांबळे, वसंत कदम, रमेश सूर्यवंशी, बालाप्रसाद बिदादा, निरज गोजमगुंडे, सारिका वरणकर आदिसह कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## प्रा. यशवंतराव केळकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त लातूरमध्ये पूर्व कार्यकर्त्यांचा मेळावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ डिसेंबर :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) च्या प्रेरणास्रोतांपैकी एक असणारे प्रा. यशवंतराव केळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त लातूर विभागात भव्य पूर्व कार्यकर्ती एकत्रीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम रविवार, दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी दयानंद सभागृह, लातूर येथे होणार आहे.




या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सहकार भारती, राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर उपस्थित राहणार आहेत. तसेच विशेष उपस्थिती म्हणून अभाविप, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री देवदत्त जोशी हेही मार्गदर्शन करणार आहेत. प्रा. यशवंतराव केळकर यांनी विद्यार्थी चळवळीत दिलेल्या योगदानाला अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर विभागातील मोठ्या संख्येने जुने व सध्याचे कार्यकर्ते या कार्यक्रमास उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. या कार्यक्रमामुळे अभाविपच्या इतिहासाला आणि कार्यकर्त्यांच्या योगदानाला उजाळा मिळणार असून युवकांमध्ये नवी प्रेरणा निर्माण होणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## हौशी मराठी नाट्य स्पर्धेत ‘दास्तां’ प्रथम तर ‘टेडी बिअर’ द्वितीय

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ डिसेंबर :** ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धेत लातूर केंद्रातून सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान, लातूर या संस्थेच्या ‘दास्तां’ या नाटकाला प्रथम पुरस्कार जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी गुरुवारी एका प्रसिद्धिपत्रकान्वये केली आहे. या नाटकाची अंतिम फेरीसाठीही निवड झाली आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा लातूर केंद्रावरील निकाल यावेळी जाहीर करण्यात आले. यामध्ये कलरिंग, लातूर या नाट्य संस्थेच्या ‘टेडी बिअर’ या नाटकास द्वितीय तर सूर्योदय बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, लातूरच्या ‘उन्हातलं चांदणं’ या नाटकास तृतीय पारितोषिक जाहीर झाले आहे. दिग्दर्शनातील प्रथम पारितोषिक महेश सबनीस यांना दास्तां नाटकासाठी घोषीत झाले. द्वितीय पारितोषिक संजय अयाचित यांना टेडी बिअर साठी, तृतीय पारितोषिक एड. शैलेश गोजमगुंडे यांना उन्हातलं चांदणं साठी घोषित झाले.

प्रकाश योजनेसाठीचे प्रथम पारितोषिक कृतार्थ कंसारा याना, द्वितीय कल्याण वाघमारे यांना, तर तृतीय पारितोषिक प्रा. जितेंद्र बनसोडे याना घोषित झाले. नेपथ्य चे प्रथम पारितोषिक वाय. डी. कुलकर्णी, द्वितीय बालाजी म्हेत्रे, तृतीय पार्थ माने यांना, रंगभूषा प्रथम पारितोषिक भारत थोरात, द्वितीय अमृता गलांडे, तृतीय स्मिता अयाचित याना घोषित झाले.

लातूरच्या मार्केट यार्डातील दगडोजीराव देशमुख सभागृहात झालेल्या या स्पर्धेत एकूण ११ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून चंद्रशेखर गोखले, विवेक खेर, अंजली पटवर्धन यांनी काम पाहिले.

## लातूर कारागृहात जनजागृती शिबीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ डिसेंबर :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या किमान समान कार्यक्रमानुसार एड्स या आजाराबाबत जनजागृतीसाठी लातूर कारागृह येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर जिल्हा न्यायालय व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे व्यंकटेश गिरवलकर, वैद्यकीय महाविद्यालयाचे समुपदेशक तानाजी भोसले, उडाण संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक प्रमोद सोमवंशी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे ढोपरे यांनी मार्गदर्शन केले. कारागृह अधीक्षक मुलाणी यावेळी उपस्थित होते.

यावेळी गिरवलकर यांनी एड्स आजाराबाबत कैद्यांना एचआयव्ही, एड्स म्हणजे काय, या आजार कसा पसरतो व त्याची लक्षणे काय आहेत, याबाबत माहिती दिली. एड्सबाबत असलेली उपचार पध्दतीबाबत तसेच सदरील आजारास प्रतिबंध कसे करता येईल, याबाबत कैद्यांना मार्गदर्शन केले.

## पन्नालाल सुराणा यांना श्रद्धांजली

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ डिसेंबर :** ज्येष्ठ समाजवादी नेते, गांधीवादी विचारवंत तथा ‘आपलं घर’ या प्रकल्पाचे आधारवड पन्नालाल सुराणा लातूर येथील ज्ञानेश्र्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी लातूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष प्रल्हादराव दुडिले, प्राचार्य संजय मलवाडे, उप प्राचार्य माधव क्षीरसागर, भाऊसाहेब उमाटे, पर्यवेक्षक हणमंत बैनगिरे, संजय कासले, जवाहर प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस.पी. साबदे, सुधाकर बुरगे, विश्वनाथ खंदाडे, प्रा. विक्रम कनामे, प्रा. आनंद देशमुख, विकास गुणले, माया अनिगुंटे, जी.पी. साबदे, अजय आरदवाड यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### सापडलेले आठ हजार रुपये केले परत; दिगंबर वाघ यांचे शहरात कौतुक



**सोयगाव :** माणसामधील माणुसकी जीवंत आहे. वडील आजारी होते म्हणून गुरुकृपा मेडिकल सोयगाव येथे गोळ्या घेताना एका व्यक्तीचे पैसे पडलेले होते. पॉकिट कुणाचे असेल असा विचार करीत शोधाशोध सुरु केली असता ते आमखेडा-आमराई गावातील मिस्तरी काम करणाऱ्या व्यक्ती उद्धव शांताराम कराळे यांचे होते. आरोग्य धूत दिंगाबर वाघ यांनी सापडलेले आठ हजार रुपये त्याला परत केले. अखेर सोयगाव शहरातील डॉ. प्रविण पाटील व्यक्तीच्या समक्ष आठ हजार रुपये असलेले पॉकीट परत करण्यात आले. वाघ यांनी प्रामाणिकतेचे कौतुक उद्धव कराळे यांची प्रामाणिकपणे पैसे परत केल्याची वार्ता गावभर पसरली.सर्वत्र कौतूक होऊ लागले. या प्रामाणिकतेचे कौतुक सोयगाव सह आमखेडा-आमराई करीत आहे.

### डाक विभागातील गैरहजर कर्मचाऱ्यास आवाहन

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर येथील पोस्टल असिस्टंट पदावरील कार्यरत कर्मचारी स्वप्निल महादेव तुपशेंद्रे हे दि.२४ मार्च २०२५पासून अनधिकृतरित्या गैरहजर आहेत. याबाबत त्यांना दि.२८ एप्रिल पंजी पत्र व इमेल द्वारे कळवून तात्काळ हजर होण्याच्या सुचना देण्यात आल्या मात्र ते हजर झाले नाहीत. सतत गैरहजर असल्यामुळे त्यांना नियम १४ अन्वये आरोपपत्र दि.१० सप्टेंबर रोजी देण्यात आले ते त्यांच्या घरच्या पत्त्यावर नोंदणीकृत डाकेने देण्यात आले मात्र दिलेल्या पत्त्यावर प्राप्तकर्ता रहात नाही अशी नोंद झाली. त्यासाठी शेवटचा पर्याय म्हणून जाहीर सुचना देऊन त्यांना कोणत्याही कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायं.६ यावेळात कार्यालयात हजर राहून आपले आरोपपत्र प्राप्त करावे,असे आवाहन सहायक निदेशक डाक सेवा, पोस्टमास्तर जनरल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

### ब्लू माउंटेन प्री-इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा दिन



**बिडकीन :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतिलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू माउंटेन प्री-इंग्लिश स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १ व २ डिसेंबर रोजी दोन दिवसीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचा शुभारंभ शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते रिबीन कापून करण्यात आला. क्रीडा दिनानिमित्त लिंबू-चमचा, धावण्याची शर्यत, झिग-झॅग शर्यत, पुस्तक संतुलन, बॉल कलेक्टिंग, रस्सीखेच तसेच संगीत खुर्ची हे खेळ घेण्यात आले.

### रियलमी ने रियलमी पी ४ एक्स स्मार्टफोन आणि रियलमी वॉच ५ भारतात केले लॉन्च

**छत्रपती संभाजीनगर, दि.५ डिसेंबर :** भारतातील तरुणांनी सर्वाधिक शिफारस केलेल्या स्मार्टफोन ब्रँड रियलमीने आज आपल्या स्मार्टफोन आणि एआयओटी पोर्टफोलिओला रियलमी पी४एक्स आणि रियलमी वॉच ५, ऑप्टीमास इलेक्ट्रॉनिक लिमिटेड (ओईएल) यांच्या सहकार्याने तयार केलेली नवीनतम मेक इन इंडिया स्मार्टवॉच, यांच्या लॉन्चसह अधिक बळकटी दिली. ही दोन्ही उत्पादने एकत्रितपणे रियलमी च्या दैनंदिन वापरात शक्तिशाली परफॉर्मन्स, उपयुक्त एआय क्षमतांचा अनुभव आणि डिझाइन-फर्स्ट इनोव्हेशन यांचे दृष्टीकोन स्पष्ट करतात. रियलमी पी ४ एक्स, फास्टेस्ट ७००० एमएएच पायोनियर, डायमेन्सिटी ७४०० अल्ट्रा ५जी चिपसेटसह सेगमेंटमधील आघाडीचा परफॉर्मन्स देतो. यात ९० एफपीएस गेमिंग आणि जीटी बूस्ट आहे, ज्यामुळे गेमप्ले अधिक स्मूथ आणि स्थिर राहतो. त्याची ७००० एमएएच टायटन बॅटरी ४५ डब्ल्यू फास्ट चार्जसह काही मिनिटांत तासन्तास वापराची शक्ती देते, तर बायपास चार्जिंग आणि स्टील व्ही-सी असलेल्या फ्रोझन क्राऊन कुलिंग सिस्टीममुळे सीपीयु तापमानात २० ओसी पर्यंत घट होते.

### मेझॉन भारतासाठी खुले करत आहे एआय

**बंगळुरू :** सुलभ प्रवेश, उत्पादकता आणि डिजिटल समावेशन वाढवण्यासाठी भारत सरकारच्या एआय मिशनला पाठींबा देत मेझॉनने आज २०३० पर्यंत भारतातील लाखो लोकांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) पोहोचवण्याची योजना जाहीर केली. कंपनी स्थानिक क्लाऊड आणि एआय इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये १२.७ अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याच्या मार्गावर आहे. आपल्या विविध व्यवसायांद्वारे १५ दशलक्षपेक्षा जास्त लघु व्यवसायांना एआयचे लाभ मिळवून देईल. मेझॉनने २०३० पर्यंत शासकीय शाळांतील ४ दशलक्ष विद्यार्थ्यांपर्यंत एआय साक्षरता-करिअर जागरूकता पोहोचवण्याचेही आश्वासन दिले आहे.

# महाराष्ट्राचा सौर कृषीपंप विश्वविक्रम; गिनीज बुकात नोंद

## सौर ऊर्जेच्या वापरातून विजेचे दर दरवर्षी ३ टक्क्यांनी कमी करण्याची मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा







**छत्रपती संभाजीनगर, दि. ५ :** महाराष्ट्राने सौर ऊर्जेचा कृषी क्षेत्रातील उपयोगात राष्ट्रीयच नव्हे तर जागतिक स्तरावर नवा बेंचमार्क स्थापित केला आहे. महावितरणतर्फे 'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेअंतर्गत एका महिन्यात ४५,९११ सौर कृषीपंप उभारण्यात आले. या उल्लेखनीय कामगिरीची अधिकृत नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये झाली. प्रमाणपत्र प्रदान सोहळा शेंद्रा एमआयडीसी येथील ऑरिक सिटी मैदानावर झाला. कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख उपस्थित होते.

गिनीजचे निरीक्षक कार्ल सॅबेले यांनी स्थळी पडताळणी करून विक्रम जाहीर केला. आवश्यक असलेल्या ३५ हजार पंपांच्या तुलनेत महाराष्ट्राने जवळपास ४६ हजार पंपांची स्थापना पूर्ण करून लक्ष्यापेक्षा अधिक कार्यक्षमता दाखवली. पंप स्थापना ते कार्यान्वयन या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता तपासल्यानंतर ही नोंद मान्य करण्यात आली.

समारंभात मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याच्या वर्षपूर्तीनिमित्त जनतेचे आभार मानत सौर ऊर्जेचा कृषी वापर हा दीर्घकालीन परिवर्तनाचा प्रवास असल्याचे नमूद केले. त्यांनी स्पष्ट केले की फिडर सौर ऊर्जेवर नेण्याच्या धोरणामुळे १६ हजार मेगावॅट स्वतंत्र कृषी वीज निर्मिती क्षमता उभारता येईल. कमी उत्पादन खर्चामुळे इतर ग्राहकांना मिळणाऱ्या विजेच्या दरात दरवर्षी किमान ३ टक्क्यांनी कपात करण्याचा रोडमॅपही त्यांनी यावेळी जाहीर केला.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की राज्यात आजपर्यंत ७ लाख सौर कृषीपंप बसविण्यात आले असून पुढील वर्षभरात ही संख्या १० लाखांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. महावितरण, पुरवठादार कंपन्या, तंत्रज्ञ आणि कर्मचार्यांच्या समन्वित कार्यप्रदर्शनामुळे हा विक्रम शक्य झाल्याचे त्यांनी विशेष अधोरेखित केले.

योजनेमुळे राज्यात सौर ऊर्जा उपकरण निर्मिती व सेवा क्षेत्रात एक लाखांहून अधिक रोजगारनिर्मिती झाली असल्याचेही त्यांनी नमूद केले. मराठवाड्याने या उपक्रमात अग्रणी भूमिका घेतली असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातच १४ हजार पंपांची स्थापना झाली आहे.

नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी योजना, नदीजोड, पाण्याचे पुनर्वितरण यांसारख्या प्रकल्पांद्वारे शेती शाश्वत करण्याच्या शासनाच्या धोरणात्मक दृष्टीकोनाची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमात मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, आ. संजय केणेकर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक लोकेश चंद्रा यांनी केले तर निता पानसरे यांनी आभार मानले.

# मतदारसंघात पिण्याचे पाणी कमी पडू देणार नाही : आ. बंब

**त.भा. वृत्तसेवा**

**लासूर स्टेशन, दि.५ डिसेंबर :** जल जीवन मिशन अंतर्गत गंगापूर आणि खुलताबाद तालुक्यात मोठ्या प्रमाणात गावागावात अंतर्गत पिण्याच्या पाईपलाईन व जल कुंभाचे काम सुरू केले आहे. पुढील एका वर्षात मतदारसंघातील गावांना पिण्याचे पाणी कमी पडू देणार नसल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत बंब यांनी केले.



लासुर स्टेशन येथे शुक्रवार (दि.५) दोन जल जलजीवन मिशन योजनेंतर्गत जलकुंभाचे भूमिपूजन आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जलजीवन मिशनचे उपअभियंता बी. बी. सदावर्ते, शाखा अभियंता समीर यन्नावार, डी.एस. कासले, कृऊबा समितीचे सभापती शेषराव जाधव, सरपंच मीना पांडव, प्रतिष्ठित व्यापारी सुरेश मुनोत यांची उपस्थिती होती.

लासुर स्टेशन येथे ग्रामपंचायत अंतर्गत पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी सावंगी आनंतपुर व सावंगी हर्सूल यासाठी अनुक्रमे तीन लाख ५५ हजार व दोन लाख ६९ हजार क्षमतेच्या दोन पाणी टाक्या (जलकुंभ) च्या कामाचे बाजारा तळ या ठिकाणी भूमिपूजन करण्यात येऊन याच ठिकाणी एक लाख ५० हजार लिटर क्षमतेचे

**लासुर स्टेशन येथे जलकुंभ व मुख्य वितरण जलकुंडाचे भूमिपूजन**

मुख्य वितरण कुंडाचे देखील काम होत असल्याची माहिती आमदार बंब यांनी यावेळी दिली.

दरम्यान यावेळी कृषी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक महेंद्र पांडे, भाजपा तालुका अध्यक्ष रवींद्र चव्हाण भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल जाधव ग्रामपंचायत सदस्य प्रकाश कोकरे, नारायण वाकळे, कल्याण पवार, अशोक सौदागर, राजू गायकवाड, रंजना बोरकर, सपना बनकर, संदीप अमराव, भगवान गाढे, राजू पठाण, सोपान बोरकर संजय पांडव यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



# आर्य चाणक्य शाळेत श्रीमद् भगवद्गीता जयंती उत्सव

**त.भा. वृत्तसेवा**

**पैठण, दि.५ डिसेंबर :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य विद्या मंदिर पैठण या संस्कार केंद्रात गीता जयंती कार्यक्रम आगळ्यावेगळ्या पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यात विविध संस्कार केंद्र आभासी पद्धतीने जोडली गेली होती. एकूण अठरा हजार विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, स्थानिक पदाधिकारी, मान्यवरांची या कार्यक्रमासाठी उपस्थिती होती.

स्थानिक ठिकाणी या कार्यक्रमासाठी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था विद्या सभेचे अध्यक्ष डॉ. जयंत जोशी, स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह जुगलकिशोर लोहिया, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष नंदकिशोर मालानी, सन्माननीय संचालक अनिल कावसानकर, रेणुकादासजी गर्गे, डॉ. सुनील गायकवाड, डॉ. प्रीती गायकवाड, जिल्हा संघचालक ॲड. राजेंद्र गोर्डे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ.ज्योती जोशी, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भास्करराव कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते भगवान योगेश्वर, भगवद्गीता ग्रंथ व संघशताब्दी प्रतिमा यांचे पूजन करण्यात आले. घरोघरी करोकरी गीता जाऊ दे हे पद्य धनसुरे यांच्यासोबत विद्यार्थी, शिक्षकांनी सामूहिक म्हटले. डॉ. जयंत जोशी यांनी प्रास्ताविक करताना भगवद्गीतेचा प्रसार जगभर होत आहे. गीता हा धार्मिक ग्रंथ नसून ती एक जीवनशैली आहे. तसेच धनुर्धर अर्जुनाच्या उदाहरणांमधून विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करावे, मनातील काहूर शांत करून निश्चित मनःशांती देण्याची शक्ती गीतेत आहे असे विचार मांडले.

# टॅगलाईन जीवंत करणारा 'आशा'चा ट्रेलर प्रदर्शित

**छत्रपती संभाजीनगर, दि.५ डिसेंबर :** काही दिवसांपूर्वी 'आशा' चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला आणि चित्रपटाच्या 'बाई अडलीयेम्हणूनच ती नडलीये' या प्रभावी टॅगलाईनमुळे टीझरने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली. त्यात रिंकू राजगुरू साकारत असलेली आशा सेविका सायकलवर बसून गावागावांतील लोकांपर्यंत पोहोचते, अशी काही झलक दाखवण्यात आली होती. या साध्या तरीही परिणामकारक दृश्यांनीच प्रेक्षकांच्या मनात आशाच्या प्रवासाबद्दल एक वेगळं कुतूहल निर्माण केलं.

याच उत्सुकतेला आणखी उधाण आलं ते, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'चालत रहा पुढे' या प्रेरणादायी गाण्यामुळे. आशाच्या संघर्षाला ऊर्जा देणाऱ्या या गाण्याला



सोशल मीडियावर मोठा प्रतिसाद मिळत असून, अनेकांनी आशाच्या जिद्दीची आणि धैर्याची स्तुती केली आहे आणि आता प्रदर्शित झालेला दमदार ट्रेलर ही उत्सुकता वाढवणारा ठरत आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा आयुष्यमान भारत - मिशन महाराष्ट्र समिती अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, ज्येष्ठ साहित्यिक आणि ९९व्या आखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील आणि फाउंडेशनच्या अध्यक्षा मंजू मंगलप्रभात लोढा आदी मान्यवरांसह 'आशा' सेविका यांच्या उपस्थितीत पार पडला.

### अभंग

मम वाणी गाते । दत्ता तुझे गीत ।
आयुष्याची रीत । समजली ।। १।।
पंचगंगास्थान । आवडे तुजसी ।
भक्ताला पाहसी । ममतेने ।। २ ।।
माझा दत्तात्रेय । सुखाचा सागर ।
प्रेमाची घागर । दिली मज ।।३।।
गुरु दत्तात्रेय । साधकाची माय ।
कामधेनु गाय देतो सर्वा ।।४।।
तयावीण देव । नाही दुजा लोकी ।
दिसते त्रिलोकी। रूप त्याचे ।।५।।
दत्त दिगंबर । दैवत आमचे ।
सार्थक जन्माचे।झाले आता ।।६।।
तुझ्या चरणाशी । साष्टांग नमन ।
सफल जीवन । झाले माझे.।।७।।

**– नारायण पांडव, छ संभाजीनगर.**

# राजेंद्र सपकाळे यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य खरेदीसाठी ११,१११ रु. ची मदत

**सोयगाव, दि.२ डिसेंबर :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पळसखेडा ता.सोयगाव येथे मित्रांच्या मदतीसाठी येणारे दानशूर



शिक्षक राजेंद्र सपकाळे यांनी भेट देत विद्यार्थ्यांशी हितगुज व संवाद साधला.शिक्षक राजेंद्र सपकाळे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पळसखेडा येथील विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य खरेदीसाठी ११,१११ रुपये अशी मदत देणगी दिली.

केवळ शिक्षक नव्हेत,तर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक,समाजासाठी आदर्श आणि उदार मनाचे प्रतीक आहेत.सपकाळ यांनी देणगी भावना ही सदैव समाजकेंद्री,नि:स्वार्थ आणि विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी समर्पित असते. त्यांनी दिलेला प्रत्येक हातभार हा त्यांच्या विशाल हृदयाचा, मनातील करुणेचा आणि समाजासाठीच्या बांधिलकीचा जिवंत पुरावा आहे. त्यांच्या या प्रेरणादायी कार्यामुळे शाळेतील क्रीडा विभाग अधिक सक्षम होणार असून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कार बळकट करण्यास मोठी मदत होईल.

या प्रसंगी आदर्श शिक्षक व शिक्षक सेना तालुका अध्यक्ष रवींद्र शेळके विशेष उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या उदार देणगीमुळे शाळेतील क्रीडा विभागाला मोठी चालना मिळणार असून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कार अधिक बळकट होणार आहेत.

सर्वांगीण प्रगतीसाठी नेहमीच पुढाकार घेणाऱ्या या दोन्ही मान्यवरांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण शाळा प्रांगण उत्साहाने भरून गेले. शाळेच्या विकासातील त्यांच्या योगदानाची दखल घेत शाळेचे मुख्याध्यापक अनिल ठाकूर, शिक्षक अर्जुन पारधे यांच्या हस्ते श्रीफळ, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

# 'अन्नामृत'ची करामत ४० हजार बालकांची रोज'अंगत पंगत'

**छत्रपती संभाजीनगर :** अन्नामृत फाऊंडेशन ही इस्कॉन अंतर्गत काम करणारी संस्था सामुहिक स्वयंपाक घराद्वारे आजमितीस जिल्ह्यातील ४० हजार बालकांपर्यंत शालेय पोषण आहार पोहोचविण्याचे काम करते. त्यामुळे दररोज ४० हजार बालकांची शाळा शाळांमधून 'अंगत-पंगत' घडविण्याची करामत अन्नामृत फाऊंडेशन करीत आहे. शासन, स्वयंसेवी संस्था आणि उद्योगांमधील सामाजिक उत्तरदायित्व निधीचा वापर करुन शालेय पोषण आहार तयार करुन तो वितरीत करण्यासाठी अन्नामृत या संस्थेची स्थापना झाली.

**अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर**

**ई निविदा क्र.: 2025_ANMC_1255663_1**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडील विविध कामांचे अनुषंगाने महाराष्ट सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२५ २६ अंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील कोठला बसस्थानक ते नटराज हॉटेलपर्यंत 1000 एम एम व्यासाची एम. एस. पाईपलाईन टाकणे या कामाचे तपशील http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

उपायुक्त
अहिल्यानगर महानगरपालिका

मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे नि. न्यायालय, जि. औरंगाबाद.

**जाहीर प्रगटन**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.:-३१२/२०२५**

अर्जदार - **१. कचरुलाल राजमल जैन,** वय, ५५ वर्षे, धंदा. मजुरी, **२. ईश्वर राजमल जैन,**, वय. ४६ वर्षे, धंदा. मजुरी, दोघेही रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, **३. वंदना सुरेशचंद्र ओस्तवाल,** वय. ५० वर्षे, धंदा- घरकाम, रा. आदर्श नगर, पिंपळगांव राजा, ता.खामगांव, जि. बुलढाणा. **४. कल्पना नरेंद्र लोढा,** वय. ५८ वर्षे, धंदा-- घरकाम, रा. टिळक नगर, सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर, **५. ज्योती रतनलाल पगारीया,** वय. ५६ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सुतार गल्ली, जामनेर, ता. जामनेर, जि. जळगांव. **६. मंगला माणिकलाल बोथरा,** वय, ७४ वर्षे, धंदा- घरकाम, रा.जुना आग्रा रोड, ईगतपुरी, ता. ईगतपुरी, जि. नाशिक. **७. चंद्रकला पोपटलाल सुराणा,** वय. ६८ वर्षे, धंदा- घरकाम, रा. पिंपळगांव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :- कोणीही नाही.**

**प्रकरण:- वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.**

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी **ॲड. वाय. आर. जावळे,** सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत राजमल अमलोक जैन हे दि. २७/०१/२०१९ रोजी मौजे. पळासखेडा ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ७ हे मयत राजमल अमलोक जैन यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन **३० दिवसांच्या आत** या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :- ०८/०१/२०२६. आज दि. ०५/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

शिक्का

सही/- विभागीय लिपीक,
आदेशांवरुन, सही/- सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव

**जाहीर प्रगटन**

**उपविभागीय अधिकारी कार्यालय, कन्नड**
जा.क्र.:२०२५/मशाका/जमाबंदी-१/
जन्म-मृत्यू नोंद/सीआर-३६
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दि.०९/१०/२०२५

अर्जदार : **श्री. धोंडू गवनाजी मोकासे,** राहणार पिशोर, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर.

विरुद्ध गैरअर्जदार : **ग्रामपंचायत कार्यालय, पिशोर,** ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर

विषय : **जन्म-मृत्यू अधिनियम १९६१ चे कलम १३(३) अन्वये दाखल अर्ज.**

अर्जदार यांनी त्यांच्या आई गयाबाई गवनाजी मोकासे यांचा दिनांक ३१/०१/२०१७ रोजी पिशोर, ता. कन्नड येथे झालेल्या मृत्यू संदर्भात मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी माननीय न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. संबंधित शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदर अर्ज दाखल करण्यात आला आहे. सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, जर कोणास गयाबाई गवनाजी मोकासे यांचा दिनांक ३१/०१/२०१७ रोजी पिशोर येथे मृत्यू झाल्याबाबत काही हरकत/उजर/आक्षेप असल्यास, त्यांनी हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत, म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १९/११/२०२५ रोजी, माननीय न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. निर्धारित मुदतीत कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास, अर्जदारास दिनांक ३१/०१/२०१७ रोजी पिशोर येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणारा कोणताही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक : २५/१०/२०२५

हे जाहीर प्रगटन माझ्या सहीऊसह व माननीय न्यायालयाच्या शिक्क्यासह निर्गमित करण्यात येत आहे.

**उपविभागीय अधिकारी, कन्नड**

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# भुत्काराच्या भाषेची भावना

'एव्हरी डॉग हॅज इट्स डे' असा एक वाक्प्रचार इंग्रजीत रूढ आहे. याचा शब्दशः अर्थ पाहिला, तर प्रत्येक श्वानाचा चमकण्याचा एक दिवस असतो. म्हणजे प्रत्येकास कधी ना कधी संधी मिळते. महाभारतातील कथेत धर्मराजाने स्वर्गारोहणाच्या समयी आपल्या आवडत्या श्वानास सोबत घेतले, पण श्वानास स्वर्गात प्रवेश नाही, या नियमांवर बोट ठेवून स्वर्गाच्या राखणदारांनी धर्मराजास प्रवेश नाकारला, तेव्हा धर्मराजाने श्वानास सोबत घेऊनच स्वर्गप्रवेश करण्याचा हेका सोडला नाही. त्या पुण्यात्म्यास प्रवेश तर द्यावाच लागेल, हे लक्षात येताच त्याच्या श्वानासह त्याचे स्वर्गारोहण झाले, अशी ही कथा आजही सांगितली जाते. त्या दिवशी धर्मराजाच्या त्या आवडत्या श्वानास स्वर्गारोहणाची संधी मिळाली. त्यानंतर श्वानकुळातील अनेकांस प्रतिष्ठेच्या संधी प्राप्त झाल्या. एखादी व्यक्ती जेवढी मोठी तेवढा त्याच्या आवडत्या पाळीव श्वानाचा मानही मोठा, ही पुढे रीतच होऊन गेली. कदाचित यामुळेच राहुल गांधी यांच्या भेटीसाठी थेट आसाममधून येऊन ताटकळलेल्या हिमंत बिस्व शर्मा यांच्याकडे दुर्लक्ष करून काँग्रेसचा हा नेता आपल्या लाडक्या 'पिद्दी' या पाळीव श्वानास बिस्कीट भरवत बसला आणि अपमानित हिमंत बिस्व शर्मा यांनी काँग्रेसचा त्याग केल्यानंतर आसाममधील काँग्रेसची सत्ता गेली, असे म्हणतात. काँग्रेस पक्षाचे नेते कार्यकर्त्यांहून किंवा पक्षाच्या अन्य नेत्यांहूनही श्वानाची प्रतिष्ठा जपतात, असा आरोप भारतीय जनता पार्टीने केल्याने त्यावर राजकीय गदारोळ माजला होता.

अशाच श्वानप्रेमाच्या कहाण्यांची मालिका जेव्हा लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर मानल्या जाणाऱ्या संसदेच्या दारापर्यंत पोहोचते तेव्हा काय होते, याचा प्रत्यय संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी देशाला आला. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, सोमवारी काँग्रेसच्या राज्यसभा सदस्या रेणुका चौधरी यांनी आपल्या गाडीतून कुत्र्याचे एक पिल्लू संसदेच्या आवारात आणले आणि तेथील सुरक्षा यंत्रणेने श्वानप्रवेशास मनाई असल्याच्या नियमावर बोट ठेवून त्या पिलास प्रवेश नाकारला. रेणुका चौधरी मात्र श्वान-प्रवेशाचे जोरदार समर्थन करीत होत्या. एका क्षणी त्या समर्थनाने एवढे शिखर गाठले की, पत्रकारांच्या एका प्रश्नावर प्रतिसाद देताना त्यांनी स्वतः श्वानाच्या भुंकण्याच्या भाषेत आपल्या भावना व्यक्त केल्या. प्राणिप्रेम किंवा भूतदयेची भावना कौतुकास्पदच; पण ज्यारीतीने त्यांनी आपल्या प्राणिप्रेमाचे प्रदर्शन केले आणि त्यासाठी संसदेत बसणाऱ्या सर्वांची तुलना श्वानकुळासोबत केली, त्यावर संतप्त प्रतिक्रिया उमटणे साहजिक होते. तशी ती उमटली आणि सर्वोच्च सभागृहाच्या प्रतिष्ठेचा अपमान केला, या जाणिवेने त्यांच्या त्या भुत्काराच्या भाषेतील भावनेच्या निषेधाचे सूरही सर्वत्र उमटू लागले. महाभारतातील त्या कथेत धर्मराजाच्या त्या श्वानास स्वर्गारोहणाची संधी मिळाली. रेणुका चौधरी यांनी मात्र सोबत आणलेल्या श्वानास आपल्यामुळे उठलेल्या गदारोळाची जाणीवही नसावी आणि रेणुका चौधरी यांच्या आक्रस्ताळ्या हट्टामागे धर्मराजासारखी पुण्याईदेखील नसावी. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा पहिला दिवस मात्र त्या श्वानावरील चर्चेचा ठरला. पक्षाचे प्रवक्ते पवन खेरा यांनाही, खोकल्यामुळे आपला सूरदेखील श्वानाच्या भुंकण्यासारखाच भासत असल्याची जाणीव झाली आणि श्वानप्रेमाच्या पुरात अवघा पक्ष डुंबू लागला. असे म्हणतात की, राहुल गांधी यांच्या श्वानप्रेमाची महती काँग्रेसजनांस अगोदरपासूनच ठाऊक असल्यामुळेच श्वानकुळास मान देण्याची चढाओढ पक्षात सुरू झाली, त्यामुळेच काँग्रेसच्या राज्यसभा सदस्य असलेल्या रेणुका चौधरी यांनी रस्त्यावर भरकटलेल्या श्वानास आपल्या गाडीत बसवून थेट संसदेपर्यंत आणण्याचा घाट घातला. त्यामुळेच पवन खेरा यांना आपला सूर श्वानाच्या भुंकण्यासारखा भासू लागला. आपला आवाजही कुत्र्याच्या भुंकण्यासारखा भासू शकतो, असे सांगून रेणुका चौधरी यांच्याशी स्पर्धा करणाऱ्या पवन खेरा यांना राज्यसभेची संधी पक्षाकडून मिळू शकेल, अशी कुजबूज आता सुरू झाली आहे. राजकारणात काय खरे आणि काय खोटे हे लगेचच ठरविता येत नाही. ते सिद्ध होण्यासाठी काही काळ जावा लागतो. त्यामुळे रेणुका चौधरी यांच्या श्वान-प्रवेशनाट्याच्या पहिल्या अंकानंतर पक्षात जे काही घडले, त्याची राहुल गांधींनी आपल्या स्वभावानुसार मजा घेतली, एवढे मात्र दिसून आले. संसदेच्या आवारात श्वानास प्रवेश नसेल, पण चावा घेणारे तर संसदेच्या सभागृहांत बसलेले असून सरकार चालवत आहेत, अशी बेताल टिप्पणीही रेणुका चौधरी यांनी केली.

हा सगळा प्रकार हास्यास्पद, लज्जास्पद आणि संसदेच्या प्रतिष्ठेची खिल्ली उडविणारा आहेच; पण काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि संसदेचे सदस्य संसदेच्या कामकाजाविषयी, नियमावलीविषयी आणि प्रतिष्ठेविषयी जरादेखील गंभीर नाहीत, याची साक्ष देणारा आहे. जे खरोखरंच चावा घेतात ते तर संसदेच्या सभागृहात बसतात आणि देशावर राज्य करतात, हे रेणुका चौधरी यांचे वक्तव्य त्याहूनही अधिक आक्षेपार्ह असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध हक्कभंगाचा प्रस्ताव मांडण्याचा सत्ताधाऱ्यांचा विचार असल्याचे स्पष्ट होताच, चौधरी यांनी त्याचीही खिल्ली उडविली. असे झाले तर त्यालाही 'मुँहतोड जबाब' देण्याची आपली तयारी आहे, हे त्यांचे वक्तव्य म्हणजे, संसदीय कामकाजाच्या नियमांविषयी कोणतीही खंत वाटत नसल्याची स्पष्ट बेफिकिरी आहे. ही तर संसदेहूनही स्वतःस श्रेष्ठ मानण्याची मानसिकता म्हणावी लागेल. चावा घेणारे आणि लचके तोडणारे तर संसदेत बसले आहेत, सरकार चालवत आहेत, त्यावर कोणास काही वाटत नाही अशा शब्दांत त्यांनी या श्वानप्रवेश नाट्याचे समर्थन करताना सरकारची तुलनाच श्वानासोबत केली आणि अधिवेशनाचा पहिला दिवस नव्य-नाट्याचा नवा अंक म्हणूनच चर्चेचा ठरला. याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सदस्यांकडून कामकाजाच्या गांभीर्याविषयी एक अपेक्षा व्यक्त केली होती. संसदेचे सभागृह हे आपल्या स्थानिक राजकारणाचे हिशेब चुकते करण्याचे केंद्र ठरू नये आणि नाटकबाजी न करता येथे विधायकरीतीने आपल्या क्षमता सिद्ध कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले होते. पण संसदेच्या परिसरात घडलेल्या या नाट्यमय प्रकारामुळे कामकाजातील सहभागाच्या विरोधकांच्या गांभीर्यावर प्रश्नचिन्ह उमटले आहे. तसेही संसदेच्या कामकाजात विरोधकांचा सहभाग केवळ अडथळे आणण्यापुरता आणि कामकाज बंद पाडण्यापुरताच असल्याचे वारंवार स्पष्ट होत गेले आहे. या श्वान-प्रवेश नाट्याचा उत्कंठेचा क्षण रेणुका चौधरी यांनी स्वतःच्या आवाजात श्वानाच्या भुंकण्याचा सूर काढून गाजविला. जेव्हा आपल्या कृतीचे समर्थन करणे शक्य नसल्याचे ध्यानात येते, त्यासाठी शब्द सापडत नाहीत, तेव्हा असे काही नाट्यमय करावे लागते. चौधरी यांनी त्या क्षणी भुंकण्याचा आवाज काढून माध्यमांच्या प्रतिनिधींच्या प्रश्नास दिलेले उत्तर हा त्याचाच एक आविष्कार होता. संसदेच्या कामकाजात अडथळे आणायचे, कुत्र्याच्या आवाजात भुंकायचे, त्याचे समर्थन करायचे आणि सरकारची तुलना श्वानासोबत करून संसदेच्या सभागृहाच्या प्रतिष्ठेवरच प्रश्नचिन्हे उभी करायची, हा नवा प्रकार राजकारणात विरोधकांकडून सुरू झाल्याचे आता पुरते स्पष्ट झाले आहे. राजकारणातील गांभीर्य आणि संसदेच्या कामकाजाची प्रतिष्ठा पणाला लागल्याचेच हे लक्षण आहे. सातत्याने पाहाव्या लागणाऱ्या पराभवानंतर सत्तारूढ भाजपाला सातत्याने लक्ष्य करून दुगाण्या झाडण्यात काँग्रेस नेत्यांनी आपली सारी शक्ती कधीपासूनच पणाला लावली आहे. जनतेने स्पष्टपणे नाकारल्याने आलेल्या नैराश्याचा हा परिणाम असू शकतो. त्या निष्पाप श्वानास प्रवेश नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ज्या वाहनातून त्याला आणले गेले, त्याच वाहनातून त्याची पाठवणी झाली होती. पण तो मुद्दा तेथेच संपला नाही. त्यामुळे निर्माण झालेल्या वादातून सरकार आणि संसदेत बसणाऱ्या सदस्यांची श्वानासोबत तुलना करून रेणुका चौधरी यांनी आपल्या मानसिकतेची पातळी दाखवून दिली आहे. संसदेत नाटकबाजी न करता गुणवत्तापूर्ण कामकाजाच्या जनतेच्या अपेक्षेस एका श्वानाने गाजविलेल्या नाटकामुळे गाजर दाखविले गेले आहेच; पण अशा नाटकबाजीचे राजकारण कोणत्या थराला नेऊन ठेवता येते, त्याचे प्रात्यक्षिक श्वानाहूनही हुबेहूब आवाजातील भुंकण्याच्या कलेतून एका दीर्घानुभवी राज्यसभा सदस्य असलेल्या महिलेच्या मानसिकतेतून देशाने पाहिले आहे. अशा घसरत्या मानसिकतेची गांभीर्याने दखल घ्यावयास हवी.

## विश्लेषण

# फिटेना अंधाराचे जाळे

**भागा वरखडे**

छत्तीसगडमधील बालोद या छोट्या जिल्ह्यात जवळजवळ दोन डझन लोक जादूटोण्याच्या नावाखाली पुरलेला खजिना शोधून काढताना अलिकडेच लुटले गेले. पूर्ण आकडेवारी अद्याप उपलब्ध नाही. कारण लोक फसवणूक झाल्याचे मान्य करायला तयार नाहीत. आपण फसवले गेलो आहोत, हे मान्य करण्यासाठी धाडस लागते. मानव एकामागून एक अनेक ग्रहांवर पोहोचत असून मानवरहित अंतराळयान आणखी दूरच्या ग्रहांवर पोहोचत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता नैसर्गिक मानवी बुद्धिमत्तेला पूर्णपणे पराभूत करत आहे, तरीही केवळ छत्तीसगड किंवा भारतातच नाही, तर जगाच्या अनेक भागांमध्ये लोक अजून ही अंधश्रद्धेत बुडाले आहेत. अलिकडे महाराष्ट्रातही अशी बुवाबाजीची प्रकरणे उघडकीस आली; नव्हे, ती सतत समोर येत असतात. दर आठवड्याला देशभर अंधश्रद्धेपायी फसवणुकीच्या अर्धा डझन घटना घडतात. दुर्दैवाने लोकांचा त्यावर इतका प्रचंड विश्वास आहे की, ते पूर्ण धर्मनिरपेक्षतेने फसवणुकीचा आनंद घेत आहेत. आता दोन डझन लोक पुढे आले आहेत, ज्यांनी दफन केलेला खजिना शोधण्यात लाखो रुपये गमावले.

वस्तुतः मुलांची वैज्ञानिक मानसिकता घडविण्याची गरज आहे. त्यासाठी प्राथमिक शाळांपासून वैज्ञानिक मानसिकता घडविणारे शिक्षण देण्याची गरज आहे. विनोबा भावे यांनी श्रद्धा आणि अंधश्रद्धेतील फरक दाखवणारे एक छोटे उदाहरण दिले होते. त्यांच्या मते अध्यात्मात श्रद्धा असते. अंधश्रद्धा नसते; परंतु श्रद्धा आणि अंधश्रद्धदेतला सूक्ष्म फरक ओळखता आला पाहिजे. परमेश्वरावर कितीही श्रद्धा असली, तरी दिल्लीला जाणाऱ्या ट्रेनमध्ये बसल्यावर ती चेन्नईला जात नसते, असे विनोबाजींनी सांगितले होते. जिथे आरोग्य सेवा उपलब्ध नाहीत, तिथे जादूटोणा आहे. कायदा ढिला आहे, तिथे पंचायती भरतात. आदिवासी भागात तांत्रिकांना अजूनही 'देवदूत' मानले जाते. हे सारे फार दुर्दैवी आहेत. झारखंड, छत्तीसगड आणि ओडिशासारख्या राज्यांमध्ये तांत्रिकांचे मोठे जाळे आहे. ते दावा करतात की, ते पाऊस आणू शकतात, बालमृत्यू रोखू शकतात आणि रोगांचे उच्चाटन करू शकतात. चेटकीण, भूत किंवा त्यागाचा अभाव ही प्रवृत्ती थांबत नाही; उलट वाढत आहे. सरकारी आकडेवारी दर्शविते की, दरवर्षी अंधश्रद्धेमुळे खून आणि अपहरणाच्या शंभर ते दीडशे घटना नोंदविल्या जातात; परंतु ही संख्या प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनांपेक्षा खूपच कमी आहे. कारण बहुतेक प्रकरणे नोंदविलीच जात नाहीत. गावपंचायत शिक्षा देते, महिला भीतीपोटी गप्प राहतात आणि समाज ती परंपरा म्हणून नाकारतो. यामुळे अंधश्रद्धेचा विळखा वाढत राहतो. मुलांना अंधश्रद्धेविरुद्ध शिकवले पाहिजे; जेणेकरून ते प्रौढ म्हणून किंवा त्यांच्या बालपणीही अशा फसवणुकीला बळी पडणार नाहीत. अशी मुले घरी जाऊन त्यांच्या पालकांना आणि कुटुंबातील इतर सदस्यांना अंधश्रद्धेविरुद्ध शिक्षित करू शकतील; पण पुरलेल्या खजिन्याच्या शोधाच्या पलीकडे, स्मशानभूमीत आकाशातून पैशांचा वर्षाव करण्याचे आश्वासन लोकांना इतके आकर्षक वाटते की, ते त्यात लाखो रुपये गुंतवतात. आज शेअर बाजारातील गुंतवणूकदार चंद्रावर भूखंड खरेदी करण्यास तयार होताना दिसतात, तेव्हा सामान्य लोकांच्या फसवणुकीबद्दल काय म्हणता येईल? एकीकडे लोकांना क्रिप्टो चलनाची स्वप्ने दाखवून आधुनिक पद्धतीने फसवले जात आहे; दुसरीकड, जादू आणि जादूटोण्याच्या नावाखाली फसवणूक केली जात आहे. भारतातील लोक दोन वेगवेगळ्या शतकांच्या संस्कृतीत राहात आहेत आणि दोन वेगवेगळ्या शतकांच्या संस्कृतींनी त्यांना लुटले जात आहे. काही लोकांना डिजिटल अटकेच्या आश्वासनाने फसवले जाते, तर काहींना फक्त जादू आणि राखेच्या आश्वासनाने फसवले जाते. आपल्या देशातील लोकांमध्ये वैज्ञानिक जागरूकतेच्या अभावामुळे फसवणूक करणारे, दरोडेखोर, तांत्रिकांचे फावते. परिणामी लोक अशा फसवणुकीला बळी पडतात; प्रसंगी स्वतःच्या मुलांचे बळीही देत आहेत. आजारी मुलाला बरे करण्यासाठी निरोगी मुलाचा बळी दिला जात आहे. इतरांच्या मुलांचा बळी देणाऱ्यांची संख्या आणखी जास्त आहे.

जनजागृतीसाठी कोणताही शॉर्टकट असू शकत नाही. अंधश्रद्धा पूर्णपणे नष्ट केली जाऊ शकते किंवा घट्ट रुजू शकते. लोक विविध धार्मिक, आध्यात्मिक, तांत्रिक आणि चमत्कारिक उपायांकडे वळू शकतात; परंतु त्यांच्या समस्या कायम राहतील आणि त्यांची संपत्ती अपरिहार्यपणे कमी होईल. अशा फसव्या तांत्रिकांकडून अनेक मुली आणि महिलांचे शोषण होत आहे आणि अंधश्रद्ध कुटुंबे त्यांना स्वीकारण्यास तयार आहेत. देशात सर्वत्र एकाच वेळी जागरूकता येऊ शकत नाही; परंतु किमान शाळकरी मुलांमध्ये एक मजबूत पाया रचला जाऊ शकतो, ज्याचा कुटुंबातील इतर मुलांवर इच्छित परिणाम होईल. सत्ता धोरणातून, प्रतिभा प्रशिक्षणातून आणि प्रसिद्धी कठोर परिश्रमातून येऊ शकते, हे लक्षात घेतले पाहिजे. ज्योतिषांनी काँग्रेसच्या राजकीय नियोजनातही भूमिका बजावली होती. असे म्हटले जाते की, काँग्रेसच्या दिल्ली कार्यालयाची वास्तुशास्त्रानुसार एकापेक्षा जास्त वेळा पुनर्बांधणी करण्यात आली आहे. भिंती बदलण्यात आल्या आहेत, आरसे बसवण्यात आले आहेत. कारंजे बसवण्यात आले आहेत. राजकीय ऊर्जा ईशान्येकडे वाहात राहावी आणि त्रास टाळता यावा, यासाठी हे सर्व केले आहे. नेते प्रत्येक मुलाखतीत हे नाकारतील. राजकारण नाटक असेल, तर क्रिकेट भावना आहे. क्रिकेटच्या मैदानातही अंधश्रद्धा दिव्यांपेक्षा जास्त चमकते. सचिन तेंडुलकर आपले डावे पॅड प्रथम घालण्यासाठी प्रसिद्ध होता. देव असो वा योगायोग; कोणीही क्रम बदलण्याची हिंमत केली नाही. बाहेरून बर्फासारखा थंड असलेला धोनी लष्करी शिस्तीसह दिनचर्येचे पालन करण्यासाठीही ओळखला जातो. एकेकाळी त्याचे लांब केस फक्त एक शैली नव्हते. चाहत्यांना असे वाटत होते की, ते 'टीम इंडिया'साठी एक भाग्यवान आकर्षण आहे. विराट कोहली मोठ्या स्पर्धांपूर्वी मंदिरांना भेट देताना, पवित्र धागे बांधताना दिसतो. अनुष्का शर्मा तणावपूर्ण सामन्यांमध्ये स्टँडमध्ये ध्यान करताना दिसली, तेव्हा संपूर्ण देश अचानक चांगल्या वातावरणावर विश्वास ठेवू लागला, हे कोण विसरू शकेल? सर्वात निर्भय गोलंदाज आणि फलंदाजांच्या मनातही न पाहिलेल्या गोष्टींची यादी असते. तेच मोजे, तेच हातमोजे, तीच 'वॉर्म-अप प्लेलिस्ट' खेळपट्टीवर जाण्याचा तोच मार्ग. मार्ग बदलला तर अचानक विकेट पडते. विज्ञान त्यावर हसते; पण क्रिकेट चाहते यावर वाद घालतात.

अभिनेता अजय देवगण बराच काळ नऊ क्रमांकाशी संबंधित आहे. त्याचे अनेक चित्रपट या तारखेला प्रदर्शित होतात. कारण अंकशास्त्र त्याला अनुकूल आहे. शाहरुख खान मोठ्या रिलीजपूर्वी अनेकदा धार्मिक स्थळांना भेट देतो. सलमान खान, ज्याच्या कारकीर्दीत अनेक चढ-उतार आले आहेत, तो संरक्षणात्मक आकर्षणे बाळगण्यासाठीही ओळखला जातो. शिस्त आणि बुद्धिमत्तेचे प्रतीक असलेले अमिताभ बच्चन नियमितपणे ज्योतिषाचा सल्ला घेतात आणि विशिष्ट रत्नांवर त्यांचा गाढ विश्वास आहे. 'हाय-टेक' कॅमेरे आणि आंतरराष्ट्रीय गर्दी असलेल्या आधुनिक सेटवरही 'मुहूर्त' हा शब्द अजूनही कायम आहे. अंधश्रद्धा जणू फॅशनेबल बनली आहे. चित्रपटांची नावे संख्येमुळे बदलतात, घरे दिशानिर्देशांमुळे निवडली जातात, कार रंगसंगतीमुळे खरेदी केल्या जातात आणि मोबाईल क्रमांक नेटवर्क कनेक्टिव्हिटीसाठी नाही, तर 'शुभ योग'साठी निवडले जातात. या अप्रत्याशित जगात अजूनही एक सामान्य माणूस सांत्वन शोधत असतो. अंधश्रद्धा जादूबद्दल नव्हे तर नियंत्रणाबद्दल आहे. ती मन आणि जगामधील एक मूक करार आहे. भारतासारख्या देशात विश्वास तर्कापेक्षा मजबूत आहे आणि आशा भीतीपेक्षा मजबूत आहे. त्यामुळे देशाच्या आत्म्याचे अंधश्रद्धेच्या वेदीवर बलिदान दिले जात असते.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# साधनेची क्रांती!

हातात महागडा मोबाईल, फटाके फोडत सायलेंसर काढलेल्या बुलेट, ओठांवर सिगारेट, तोंडात खर्रा आणि रात्रीचा मुक्काम कुठला तरी बार... असा प्रवास १०० पैकी ४० तरुणांचा सुरू आहे. देव आणि अध्यात्म तर त्यांच्यासाठी थोतांड आहे. तरुणींचं तर विचारूच नका! नागपुरात २ डिसेंबरला एका विवाह कार्यात एक युवती चार मुलांच्या घोळक्यात उभी राहून भरदिवसा चौकात सिगारेट ओढत होती. म्हणजे मुलांची बरोबरी! नवीन पिढी कशी निघेल याविषयी स्वतंत्र चर्चाच अपेक्षित! पण, आपल्याच महाराष्ट्रातील अहिल्यानगरातील मुलाने जन्म घेतला की त्याच्या तपश्चर्येने केवळ गाव नाही तर संपूर्ण देश उजळला आहे. ते नाव म्हणजे देवव्रत महेश रेखे! वय १९ वर्षे आणि कामगिरी ५० दिवसांत शुक्ल यजुर्वेदातील तब्बल २००० मंत्रांचे दंडकर्म पारायण! उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ त्याचा सत्कार केला तर त्याचा संकल्प सिद्धीस गेल्या गेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करून देवव्रतचे अभिनंदन केले. दंडकर्म पारायण म्हणजे केवळ मंत्र उच्चारण नव्हे. दंडकर्म म्हणजे नेमस्त ध्यान आणि कठोर साधना. रोज सकाळी सूर्योदयापूर्वी सुरू होणारा आणि दिवसभर चालणारा हा प्रवास फक्त स्नायूंचा नाही, तो मनाचा प्रवास आहे. देवव्रतने शरीर आणि मन दोन्ही एकाच शिस्तीत बांधले. ५० दिवस तोच ध्यास, तोच जप, तोच नियम! कुठे थकवा, कुठे मन डळमळले असेल; श्रद्धेने त्याचा पराभव केला. सोबत वडीलही होते. संकल्प पूर्ण झाला, फुलांचा वर्षाव केला गेला आणि सर्वात पहिले देवव्रतला त्याच्या वडिलांनी कवटाळले. बापासाठी अभिमान आणि मातेची कूस या निमित्ताने उजळून निघाली. देवव्रतसारख्या तरुणाला बाहेरील आकर्षणं दूर ठेवण्याची ताकद कशी आली? एका वाक्यात उत्तर द्यायचे झाल्यास ते म्हणजे संस्कार! त्याच्या मागे त्याचे आई-वडील उभे आहेत. त्यांनी त्याला संस्कृतीची नुसती ओळख करून दिली नाही तर ती जगायला शिकवली. ज्या दिवशी पारायण पूर्ण झाले, तेव्हा वडिलांनी त्याला हृदयाशी घट्ट कवेत घेतलेला फोटो सोशल मीडियावर पाहून अनेकांच्या डोळ्यांत पाणी आले. इतक्या तरुण वयात पोटच्या लेकराने संपूर्ण वंशाला नव्हे, तर देशाला अभिमान वाटावा अशी कामगिरी केली तर त्या क्षणी भावना बोलक्या झाल्या आणि देवव्रत त्या भावनांचा धनी ठरला. देवव्रत या नावाला भीष्म पितामहांची परंपरा लाभली. देवव्रतच्या निमित्ताने महाभारतातील भीष्म पितामहांची आठवण झाली. त्यांची वचनपूर्ती, निष्ठा आणि त्याग या तीन गुणांची व्याख्या त्याच नावात दडलेली आहे. त्या नावाचे सार्थक केवळ कौतुकासाठी नव्हे, तर वेदांची परंपरा जगवण्याचे कार्य आधुनिक 'भीष्मा'ने केले आहे. शुक्ल यजुर्वेदाची २००० मंत्रांची निखळ अचूकता, आवाजातील प्रत्येक स्वर, श्वासातील प्रत्येक हलचल, अर्थाच्या प्रत्येक छटा या तपश्चर्येची साक्ष होती. वेदांची परंपरा ही शब्दांची नाही तर संपूर्ण विश्वाशी संवाद साधण्याची कला आहे. देवव्रतने त्या विश्वाशी जोड निर्माण केली आहे. संस्कृती म्हणजे मागासपणा नाही. ती आपल्या मुळांची ओळख. वृक्ष उंच वाढायचा असेल तर त्याची मुळं खोल असावी लागतात. देवव्रतने या आधुनिक युगात वैश्विक वातावरणात जमिनीच्या वर तोंड काढलेली मुळं खोलवर रुजवली. वेद म्हणजे देव घरातली वस्तू नव्हे ते जगण्याचे तत्त्वज्ञान आहे. जशी मनुस्मृती! ती कोण्या एका जातीसाठी नाही तर तेही एक आचारसंहिता शिकवते. तिचे कव्हरही न उघडून बघणारे मनुस्मृतीविषयी छाती बदडत फिरतात. देवव्रतविषयीही समाजमाध्यमावर टीकाचा भडीमार होतो आहे. तंत्रज्ञान शिका, प्रगती करा, पण आपल्या मुळांना विसरू नका. करीअर महत्त्वाचेच, पण चरित्र त्याहून महत्त्वाचे. दंडकर्मातून त्याने स्वतःला जिंकले आणि विजय मिळविला. आता घराघरातून लहान मुलांना देवव्रत सांगितला गेला पाहिजे, शिकवला पाहिजे. तरुणाईनेही डोळे उघडे ठेवून देवव्रतच्या व्रतस्तपणावर चर्चा केली पाहिजे. कारण त्याच नवीन पिढीतून एक देवव्रत जन्माला येतो. हाच देवव्रत आजच्या पिढीचा कलंक पुसून टाकेल. दिशा दाखवणारे दिवे जन्माला येतात तेव्हा काळाचा अंधार कमी होतो. देवव्रत त्यातलाच एक दिवा ठरावा.त्याच्या संकल्पातून भारत माता अजून उजळून निघो...

९८८१९०३७६५

## दखल

# जिंकणार तर महायुतीच

**मोरेश्वर बडगे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर 'अशी निवडणूक प्रथमच पाहतोय.' निकाल लांबल्याने ही निवडणूक 'धिंगाणा' झाली. निवडणूक राबविणाऱ्या यंत्रणा कशा प्रकारे काम करतात, त्याचे दर्शन झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांची ही निवडणूक आता शेवटच्या टप्प्यात आहे. निकालासाठी तब्बल तीन आठवडे थांबविणारी ही निवडणूक तमाम लोकांच्या सहनशक्तीची परीक्षाच घेत आहे. शेवटच्या क्षणी २८४ पैकी २४ ठिकाणी राज्य निवडणूक आयोगाने मतदान पुढे ढकलले होते. ते आता २० डिसेंबर रोजी होणार आहे. हायकोर्टाने आता एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला साऱ्या जागांची मतमोजणी आणि निकाल ठेवायला सांगितले आहे. पण लोकशाहीत लोकांचा कौल ऐकायचा असेल तर थांबावेच लागेल. लोक थांबले आहेत. तब्बल आठ वर्षांनी या निवडणुका होत आहेत त्यामुळे प्रचंड उत्सुकता आहे. स्थानिक पातळीवरच्या या निवडणुकांचे यंदाचे वैशिष्ट्य म्हणजे विरोधकांची महाविकास आघाडी कुठे दिसलीच नाही. महायुतीमध्येच लढाया झाल्या. 'जमेल तिथे महायुती नाहीतर मैत्रीपूर्ण लढत' अशी भूमिका भाजपाने घेतली होती. अनेक जागी विचित्र राजकीय समीकरणे पाहायला मिळाली. शरद पवार, उद्धव ठाकरे प्रचारात दिसले नाहीत हे विशेष. काँग्रेसवालेही दूर राहिले. ही 'कार्यकर्त्यांची निवडणूक' असे सांगून हे ज्येष्ठ नेते बाजूला राहिले. लोकसभा, विधानसभा निवडणुकीला या नेत्यांना कार्यकर्ते लागतात. जेव्हा कार्यकर्त्यांची निवडणूक असते तेव्हा पुढारी गायब असतात. शरद पवार, उद्धव ठाकरे यांना फिरावेसे वाटले नाही. मात्र, महायुतीचे देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार जोरात फिरले. अजितदादा तर घरच्या लग्नालाही गेले नाहीत. 'लाव रे तो फोन' म्हणत एकनाथ शिंदे यांनी प्रचारात नवेपणा आणला. फडणवीस यांनी दिवसाला सहा-सहा सभा करून निवडणुकीत जोश आणला. विरोधक आपापल्या भागापुरते सक्रिय दिसले. पराभूत मानसिकतेतून विरोधक बाहेर यायला तयार नाहीत.

निवडणुकीच्या वातावरण निर्मितीत मीडियाचे आणि खासकरून टीव्ही मीडियाचे वागणे खटकले. महायुतीत सारे कसे आलबेल नाही, हे दाखवण्यातच वृत्तवाहिन्या खपल्या. महायुतीत मतभेद आहेत हे कोणी नाकारत नाही. युतीच्या काही नेत्यांनी केलेल्या काही वक्तव्यांमुळे आगीत तेल ओतले. देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या सर्वसमावेशक भूमिकेमुळे परिस्थिती आटोक्यात राहिली.



घरातल्या दोन भावांची मतंही वेगवेगळी असतात. तसं काही गोष्टींवर आमचेही एकमत होत नाही, ही गोष्ट फडणवीस कबूल करतात. 'सगळ्या गोष्टींवर एकमत असते तर वेगळा पक्ष कशाला पाहिजे? आम्ही एकच पक्ष असतो' असा बिनतोड सवाल फडणवीसांनी एका कार्यक्रमात केला. भाजपाची ताकद वाढली म्हणून मित्रपक्षांना सोडणार नाही, असेही फडणवीस म्हणतात. २०२९ च्या निवडणुका महायुती म्हणूनच लढणार, असेही त्यांनी सांगून टाकले. फडणवीसांचे हे वक्तव्य महायुतीला अधिक भक्कम करणारे आहे. जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुकांमध्ये याचा भाजपाला फायदा होईल. मात्र, या निवडणुका लांबणार आहेत. फेब्रुवारी उजाडू शकतो. ३१ जानेवारीच्या आत निवडणुका घेऊन मोकळे व्हा, असे सुप्रीम कोर्टाने सांगितले होते; पण तसे अवघड आहे.

खरी चुरस महापालिका निवडणुकांमध्ये दिसणार आहे. विरोधी पक्ष कशा प्रकारे महापालिका निवडणुकांना समोर जाणार आहे? महाविकास आघाडी भक्कम दिसेल की चुलत भावाला सोबत घेण्याच्या धडपडीत उद्धव यशस्वी होतील? खरी मारामार मुंबई महापालिकेसाठी आहे. मुंबईची निवडणूक स्वबळावर लढायचा निर्णय काँग्रेसने आधीच जाहीर केला आहे. मग उद्धव ठाकरे यांची उबाठा कुठे बसणार? शरद पवार यांनी अजून निर्णय केलेला नाही. पवारांची मुंबईमध्ये फारशी ताकद नाही. त्यामुळे उद्धव यांच्यासाठी राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना हाच एक आशेचा किरण आहे. २०१९ मध्ये मुख्यमंत्री बनण्याच्या स्वार्थापायी उद्धव ठाकरे यांच्यावर आता सर्वस्व गमावून बसायची वेळ आली आहे. आता मतांसाठीची त्यांची लाचारी पाहिली तर त्यांनी काय गमावलं ते लक्षात येते. एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांना घेऊन बंड केले. केवळ उद्धव सरकार पडलेच नव्हे तर त्यांचा पक्ष, त्यांचे निवडणूक चिन्ह नेले. उद्धव आज रिकामे आहेत. शरद पवारांचीही परिस्थिती वेगळी नाही. पुतण्या सोडून गेला. जाताना त्याने काकाचा पक्षही नेला, निवडणूक चिन्हही नेले. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका महाविकास आघाडीने मिळून लढल्या. त्याचा फायदा ठाकरेंना झाला. काँग्रेस सोबतीला असल्याने मुसलमान आणि दलितांची मतं उबाठाच्या खात्यात गेली. ठाकरे सेनेचे २० आमदार निवडून आले. त्यातले १० मुंबईतले आहेत. आता काँग्रेस सोबतीला नाही म्हटल्याने उद्धव यांची तारांबळ उडाली आहे. त्यांच्याकडे आज हक्काचा मतदारच उरला नाही. त्यातूनच त्यांना चुलतभाऊ हवा आहे. स्वबळावर लढण्याएवढे बळ आज काँग्रेसकडे नाही. तरीही काँग्रेसवाले स्वबळाचा हट्ट धरून आहेत. गेल्या निवडणुकीपेक्षा काँग्रेसची आज खस्ता हालत आहे. येथेच एक 'अंदर की बात' आहे. सारीच तिकिटे लढण्यासाठी नसतात. काही 'विकण्यासाठी'ही असतात. एकेका तिकिटाचा मार्केट भाव पाहिला तर हा सौदा काही कोटी रुपयांचा होतो. बिहारच्या निवडणुकीत हा तमाशा दिसला. तेथे काँग्रेसने फक्त ४ जागा जिंकल्या, पण हट्ट करून ६१ जागा लढवल्या. ताकद नाही तर इतक्या जागा का मागितल्या? इतरांची विक्री झाली नसेल हे कशावरून? ज्या राज ठाकरेंचा फोन उद्धव उचलत नव्हते त्या राज यांची सोबत मिळावी यासाठी उद्धव यांना मराठी अस्मिता, महाराष्ट्र हित... सारे काही आज आठवत आहे. भाजपाला संपवण्यासाठी आम्ही एकत्र आलो, असे दोघा भावांनी जाहीरपणे सांगितलेले नाही. ठाकरे परिवार तुटू नये, अशी बाळासाहेब ठाकरेंची इच्छा होती. पण बाळासाहेबांच्या हयातीतच राज यांनी 'मातोश्री' सोडली होती. त्यानंतर हे दोन भाऊ एकत्र यावे, असे बाळासाहेबांना वाटत असे. बाळासाहेबांना जमले नाही ते देवेंद्र फडणवीस यांनी करून दाखवले, असे राज ठाकरे वरळीच्या मेळाव्यात बोलले होते. याचा अर्थ काय? बाळासाहेबांना खूप काही करायचे होते. शिवसैनिकाला मुख्यमंत्री करायचे होते. तो शिवसैनिक म्हणजे मीच असा अर्थ घेऊन उद्धव यांनी स्वतःचे जमवून घेतले. पण ते महागात पडलंय. आता पुढे काय वाढलंय? नातं कामी येणार? नात्यात अटीशर्ती नसतात. युती म्हटले तर मग जागावाटपाचा विषय येतोच. उद्धवसेनेच्या हक्काच्या २५ जागा राज यांना हव्या आहेत. उद्धव या जागा राजला सोडतील? उत्तर तुम्हाला माहीत आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-६३

शुक्रवार, ५ डिसेंबर २०२५

### आर्त भक्तिने स्मरता केशव! कोटि जीवने तुझ्यात विरतील

आर्त भक्तिने स्मरता केशव! कोटि जीवने तुझ्यात विरतील ॥धृ.॥

शांतहृदय तू विशाल सागर चारित्र्याचा शुभ्र हिमाचल
आकाशाची तुझी भव्यता प्रसन्न जीवन गंगेचे जल ॥१॥

उदरी लाव्हा रसरसलेला वरून पण ही क्षमाशिलता
त्यासम जीवन तुझे केशवा उरांत ज्वाला वरून शीतल ॥२॥

धुतले अमुचे मलीन जीवन घर्मबिंदुचे शिंपुन तू जल
राष्ट्रभक्तिचे बीज पेरुनी तूच फुलविली धरती शामल ॥३॥

कृतिचा धरिला तू गोवर्धन लावुन त्याला कोटी बाहुबल
मातृभक्तिच्या सेतूवरुनी स्वर्ग जिंकण्या वीर धावतिल ॥४॥

मातृमंदिरी धुंद होउनी लावुनि भाली मातृचरणधुल
कोटि मुखांनी तूच गर्जला जय मृत्युंजय माता मंगल ॥५॥

भवितव्याच्या सागरातला स्तंभदीप तू निर्भय निश्चल
करोत कितीही आज उपेक्षा अखेर सारे तुलाच स्मरतिल ॥६॥

तुझ्या स्मृतीने जीव तगमगे नेत्रांतुन जल निर्मळ खळते
कणाकणाने विरून व्हावे श्रद्धेया! मी अंश तुझ्यातिल ॥७॥

## विरोधी पक्षाला समज का येत नाही?

सध्या पूर्णपणे सरकार रालोआचे असताना आपल्याला पुन्हा ताकद यावी यासाठी विरोधी पक्ष आणि त्यांचे पुढारी प्रयत्नच करीत नाहीत असे चित्र सातत्याने लोकसभेच्या सभागृहात दिसते. काही विषय समजून न घेता त्यावर केवळ चर्वितचर्वण करून सभागृह बंद पाडणे यातून अजूनच पक्षाची प्रतिमा खराब होते याचे भान महाआघाडीला दिसत नाही. जे भाषण प्रचार सभेत अपेक्षित असते ते सभागृहात करून आपल्या ज्ञानाचे धिंडवडे निघतात, हे समजण्याएवढे पक्षाचे सर्वेसर्वा अज्ञानी आहेत का? एखाद्या धर्माला टार्गेट करण्यासाठी हे सभागृह नाही एवढेही लक्षात येऊ नये यापेक्षा दुर्दैव नाही. न्यायालय, कायदे आणि घटना यावर अविश्वास दाखवून देश ताब्यात घेता येत नाही. त्यासाठी सभागृहाचे नियम पाळावे लागतात, देशाबद्दल अभिमान बाळगावा लागतो. सातत्याने परदेशात राहून मोर्चे, बंद, गुंडगिरी आणि असभ्यता बाळगून हाती काहीही लागत नाही ही इतिहासाची साक्ष आहे. म्हणूनच कोणाबद्दल कसा आदर राखावा याचे शिक्षण घेणे आवश्यक वाटते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

## वाचक पत्रे

### बिबट्या आणि भटक्या कुत्र्यांचा धुमाकूळ

सध्या देशभर भटक्या कुत्र्यांचा आणि बिबट्यांचा धुमाकूळ पाहायला मिळतो. या भटक्या कुत्र्यांनी आणि बिबट्यांनी इतका उच्छाद मांडला आहे की, ज्या शहरांमध्ये किंवा गावांमध्ये स्वतःला सुरक्षित म्हणून सामान्य माणूस राहतो आहे, तिथेच आता या भटक्या कुत्र्यांनी आणि बिबट्यांनी सुद्धा शिरकाव केल्याने त्यांच्या या हिंस्र आक्रमणाला तोंड देता देता सामान्य माणसाला नाकीनऊ येत आहे. अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाने याबाबत कठोर निर्देश देऊन रुग्णालये, शाळा, महाविद्यालये म्हणजेच जी सार्वजनिक ठिकाणे आहेत त्या ठिकाणी त्या भटक्या कुत्र्यांना तातडीने आटोक्यात किंवा पकडण्याच्या सूचना दिल्या आहेत. एकीकडे हे निर्देश दिले जात असताना आपल्या राज्यात सुद्धा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला खेड्यापाड्यांतला बिबट्यांचा धुमाकूळ थांबवण्याकरिता काही उपाय करायला सुरुवात केली आहे. परंतु महाराष्ट्रातही बिबट्यांबरोबर भटक्या कुत्र्यांची समस्या निर्माण झाली आहे. जी चिंताजनक बाब ठरते.

या गोष्टींचा व्यापक अर्थाने विचार केला तर मनुष्याच्या किंवा सर्वसामान्य माणसाच्या आजूबाजूला कोणती हिंसक घटना कशाप्रकारे घडून येईल याची काही खात्री नसते. मग कधी जातिवादाचे हिंस्र रूप पाहायला मिळते तर कधी राजकीय हेव्यादाव्यातून एकमेकांच्या हत्या करण्याच्या दिल्या जाणाऱ्या सुपाऱ्यांचा हिंस्रपणा पाहायला मिळतो. माणसांचा व्यवहार तर दुसरीकडे जे मुके प्राणी आहेत तेसुद्धा माणसाला हैराण करण्यासाठी तयार होऊन बसलेले पाहायला मिळतात. एकूणच समाज व्यवस्थेचा विचार करताना भटक्या कुत्र्यांपासून ते बिबट्यांपर्यंत किंवा माणुसकीलाही काळिमा फासणाऱ्या अनेक हिंसक घटनांचा एक विचित्र आघात सातत्याने पाहायला मिळतो आहे. अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाने कुत्र्यांबाबतचे दिलेले आदेश हादेखील देशातला एक अभूतपूर्व प्रकार ठरतो. ज्या कुत्र्यांना आपण पाळीव प्राणी समजतो आणि ज्यांच्याकडे नेहमीच दुर्लक्ष होत असते. परंतु तोच कुत्र्यांचा विषय हा थेट सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख निर्देशाचाही एक भाग होतो यावरून त्याचे गांभीर्य किती तीव्र प्रमाणात आहे याची कल्पना येते. एकूणच वेगवेगळ्या पद्धतीने या समस्यांना सामोरे जाण्याची वेळ सामान्य माणसावर येत असते. आणि म्हणूनच त्याच्या सुरक्षिततेचे प्रश्न अधिकाधिक गंभीर होत आहेत. या सर्व बिकट परिस्थितीतून स्वतःला सुरक्षित किंवा सुखरूप ठेवणे हीदेखील त्याच्यासाठी एक मोठी कसरत ठरलेली आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### नगर परिषद निवडणुकीत प्रहार जनशक्ती पक्षाचा राष्ट्रीय समाज पक्षास पाठिंबा..

**परभणी,/प्रतिनिधी-** प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष मा.आ. बच्चुभाऊ कडू यांच्या आदेशाने परभणी जिल्ह्यात होणाऱ्या पाथरी, सोनपेठ व पूर्णा नगर परिषद निवडणूकीमध्ये राष्ट्रीय समाज पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या व नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारास प्रहार जनशक्ती पक्ष, परभणी व प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन संस्था, परभणीच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात येत आहे.

ही निवडणूक प्रहार जनशक्ती पक्ष व राष्ट्रीय समाज पक्ष एकत्रित लढवत असून प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन संस्थेच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व प्रहार सेवकांनी जिथे जिथे राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार आहेत तिथे प्रचारात प्रत्यक्ष भाग घेवून सहकार्य करावे व संबंधित उमेदवारांना जास्तीत जास्त मतदान कसे होईल यासाठी प्रयत्न करावेत. असे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने, जिल्हा सचिव रामेश्वर पुरी व प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन संस्था जिल्हाप्रमुख केशव जाधव यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

### गंगाखेडमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा, शहीदांना आदरांजली



**गंगाखेड,/प्रतिनिधी-** भगवती मंदिर, शिवाजी चौक, गंगाखेड येथे महापुरुष जयंती समितीच्या वतीने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले जवान व नागरिक यांना आदरांजली अर्पण करून झाली.

प्रमुख उपस्थित म्हणून संत जनाबाई महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रा. डी. एस. जाधव यांनी उपस्थितांना संबोधित केले. आपल्या भाषणात त्यांनी भारतीय संविधानाची निर्मिती, त्याची वैशिष्ट्ये आणि लोकशाहीरचना मजबूत ठेवण्यात त्याची महत्वाची भूमिका यावर सविस्तर प्रकाश टाकला. भारतीय संविधानाची मांडणी करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेली अफाट मेहनत, त्यांची लोकशाही मूल्यांवरील निष्ठा आणि सामाजिक न्यायाची भूमिका जाधव सरांनी विशेषत्वाने अधोरेखित केली. संविधानाचे अध्ययन आणि त्यातील मूलभूत अधिकारकर्तव्ये प्रत्येक नागरिकाने जाणून घेणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.प्रसंगी गोविंदराव यादव, वसंतराव नाईक स्मारक समिती अध्यक्ष अंबादास राठोड, प्रा. रामचंद्र पवार, सोनेराव चव्हाण, जावेद इनामदार, अंबादास चव्हाण, अनावडे, प्रेमानंद बर्वे, सखाराम इरकर, अंकुश आळसे, संजय घोरपडे, इस्तियाक अन्सारी यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक महापुरुष जयंती समिती होते, तर संकल्पक म्हणून माधवराव चव्हाण, नारायणराव घनवटे तसेच समितीचे सर्व कार्यकर्ते यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

### भारतीय किसान संघाच्या प्रसिद्धी प्रमुख पदी - राम पवार

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** भारतीय किसान संघाच्या परभणी जिल्हा प्रसिद्ध आणि प्रचार प्रमुख पदी गंगाखेड तालुक्यातील खंडाळी येथील राम पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



परभणी जिल्हा भारतीय किसान संघाच्या प्रसिद्धी प्रमुख पदी राम पवार यांची निवड झाल्याबद्दल प्रांताध्यक्ष बळीराम सोळंके, महिला आघाडी प्रांत प्रमुख राजश्रीताई जामगे, प्रांत महामंत्री मदन देशपांडे, प्रांत संघटन मंत्री चंदन पाटील, प्रांत मंत्री डॉ. संतोष गटने, जिल्हाध्यक्ष नामदेवराव बुचाले, आदी मान्यवरांनी अभिनंदन केले, तसेच सर्व क्षेत्रातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

### काशीफुल उलूम मदरशाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा;

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** राज्यातील छत्रपती संभाजीनगर येथील जामा मस्जिद परिसरात स्थित अरबी धार्मिक मदरसा जामिया इस्लामिया काशीफुल उलूम च्या सर्व माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहमेळावा दिनांक २९ नोव्हेंबर रोजी जिंतूर शहरातील चंद्रगिरी लॉन्स येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यासाठी राज्यभरातून तसेच इतर राज्यांतील माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मदरशाचे माजी विद्यार्थी व आयोजक मुफ्ती मिर्झा कलीम बेग यांनी पत्रकार परिषदेत केले.

मेळावा भव्य स्वरूपात; हजारो उपस्थितीची अपेक्षा शनिवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना मुफ्ती कलीम बेग म्हणाले की''काशीफुल उलूम ही राज्यातील एक प्रतिष्ठित अरबी धार्मिक संस्था असून येथून शिकलेले हजारो विद्यार्थी आज विविध मस्जिद, मदरसे आणि सामाजिक क्षेत्रात आपली सेवा बजावत आहेत. त्यामुळे हा मेळावा अत्यंत ऐतिहासिक ठरणार आहे.'' पन्नास वर्षे सेवेत राहिलेले अध्यक्ष मौलाना रियाजोद्दीन फारुकी नदवी १९६४ ते २०१५ या कालावधीत मदरशाचे अध्यक्ष म्हणून मौलाना मोहम्मद रियाजोद्दीन फारुकी नदवी यांनी काय केले.

सोलापूर **तरुण भारत**

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# चंपाषष्ठी निमित्त मल्हारगड संस्थान येथे शिवमहापुराण व किर्तन महोत्सवाची सेलूत उत्साहात सांगता

## देवगावफाटा येथील श्री क्षेत्र मल्हार गडावर : अखंड हरिनाम सप्ताहास भाविकांचा प्रतिसाद

**सेलू,/प्रतिनिधी-** चंपाषष्टीनिमित्त सेलू तालुक्यातील देवगावफाटा येथील श्री क्षेत्र मल्हार गडावर खंडोबा महोत्सव आयोजित करण्यात आला. या महोत्सवानिमित्त २१ ते २८ नोव्हेंबर दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व भव्य संगीत शिवमहापुराण कथा व किर्तन महोत्सवाचे व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री क्षेत्र मल्हार गडावरील खंडोबा मंदिरात शुक्रवार ( ता २१ ) पासून सात दिवस दररोज काकडा आरती, भजन, प्रार्थना पसायदान, ज्ञानेश्वरी पारायन व दुपारी १२ ते ४ महाराष्टातील नामवंत कथाकार श्री पं पु हरिहरानंद भारती स्वामीजी महाराज यांच्या अमृत वाणीतून संगीतमय वातावरणात शिवमहापुराण कथा, सायंकाळी हरिपाठ व त्यानंतर दररोज रात्री ८ ते १० कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात श्री ह भ प कृष्णा महाराज, श्री ह भ प गणेश महाराज गलांडे, सुभाष महाराज जाधव यांचे किर्तन झाले असून दिनांक २४ नोव्हेंबर सोमवार रोजी श्री ह भ प विश्वंभर महाराज माळोदे,२५ मंगळवार रोजी श्री ह भ प राजेंद्र महाराज चोरडिया छत्रपती संभाजीनगर,२६ बुधवार रोजी श्री ह भ प मनमोहनजी जी महाराज गिरी आळंदी देवाची,२७ गुरवार रोजी श्री ह भ प महादेव महाराज बोराडे शास्त्री बिड,व दिनांक २८ नोव्हेंबर शुक्रवार रोजी सकाळी १० ते १२ किर्तनकेशरी श्री ह भ प अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर बाणदार खेळणे,व पालखी सोहळा कार्यक्रम व भव्य महाप्रसाद होऊन कार्यक्रमाची सांगता होणार आहे.तरी सर्व पंचक्रोशीतील नागरिकांनी किर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा अशी विनंती मल्हारगड संस्थान तर्फे करण्यात आली आहे, यावेळी या ठिकाणचा परिसर हा भावीकांनी गजबजून जातो. त्यात हे ठिकाण रमणीय आहे. मंदिराच्या पाठीराच्या पाठीमागून काही अंतरावरच करपरा नदी वाहते. तर मदिराच्या समोरील परिसरात एक पाझर तलाव आहे. त्यामुळे मंदिर परिसरात निसर्गरम्य वातावरण पाहावयास मिळते. त्यामुळे या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त भावीकांनी लाभ घ्यावा असे आवाहन खंडोबा मंदिर संस्थान च्या वतीने करण्यात आले आहे.

### शासनाने सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी !

**श्री खंडोबा मंदिर मल्हारगड संस्थान ला तिर्थक्षेत्र क वर्ग दर्जा प्राप्त झाला असून परिसरातील गावच्या गावकऱ्यांच्या सहकार्यातून देवस्थान तसेच समाज बांधवांच्या दातृत्वातून हा यात्रामहोत्सव दरवर्षी सुरळीत पार पडतो. समाजाचे दातृत्व, विश्वस्तांचे परिश्रम व पंचक्रोशीतील भावीकांची मोठी श्रध्दा यामुळेच या यात्रामहोत्सवाला दरवर्षी व्यापकता मिळत आहे. दरवर्षीच भावीकांच्या गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. दरवर्षी चंपाषष्ठी महोत्सवानिमित्त परिसरातील २०ते २५ गावांच्या दिंड्या घेऊन भाविक दर्शनासाठी येतात यामुळे आता शासनाने या श्री क्षेत्र मल्हार गडावर असलेल्या खंडोबा देवस्थानाला आता तिर्थक्षेत्र विकास निधीतून व लोकप्रतिनिधी विषेश लक्ष देऊन या ठिकाणाचा विकास करणे गरजेचे आहे व पायभूत सोयसुविधा उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली आहे. अशी मागणी भक्तांसह नागरीकांमधून केली जात आहे.**



## ईद्रीस मुलतानी : मुस्लिम समाज विकासासाठी भाजपासोबत- पालकमंत्री मेघना साकोरे

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित भव्य जाहीर सभेला मुस्लिम समाजाचा जबरदस्त प्रतिसाद मिळाल्याचे चित्र काल पाहायला मिळाले. या सभेत ईद्रीस मुलतानी आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या जोशपूर्ण भाषणांनी वातावरण एकदम रंगात आले.

सभेची सुरुवात प्रमुख वक्ते म. ईद्रीस मुलतानी यांच्या जोरदार भाषणाने झाली. मुलतानी म्हणाले ''विरोधकांनी भीती दाखवून सत्ता भोगली, पण आता मुस्लिम समाज विकासाच्या राजकारणाला पसंती देत भारतीय जनता पक्षासोबत एकत्र आला आहे.'' त्यांच्या या विधानाला ठिकठिकाणाहून टाळ्यांचा कडकडाट झाला. यानंतर राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी जिंतूरच्या इतिहासातील अभूतपूर्व निर्णयाची माहिती देताना विरोधकांवर जोरदार टीका केली. त्यांनी मंचावरून स्पष्ट शब्दांत म्हटले ''ज्यांनी आयुष्यात डबरोटीचा कारखाना काढला नाही, त्यांना साखर कारखाना काय समजणार!'' ही ओळ बोलताच संपूर्ण सभास्थळात टाळ्यांचा आणि घोषणांचा आवाज गगनाला भिडला. मेघना बोर्डीकर यांनी पुढे सांगितले ''भाजपाने यंदा २५ पैकी १५ उमेदवार मुस्लिम समाजातून दिले आहेत. जिंतूरमध्ये हे प्रथमच घडत आहे. येणाऱ्या काळात उपनगराध्यक्षाचा चेहराही मुस्लिम समाजातील असेल.'' या सभेला मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. युवक, महिला, विविध समाजघटकांची गर्दी इतकी होती की सभास्थळ संपूर्ण भरून गेले. जिंतूर शहरात निवडणुकीची चुरस आणि लोकांचा उत्साह स्पष्टपणे जाणवत होता. या जाहीर सभेसाठी समीर जानीमिया डॉ. पंडित दराडे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष मतीन तांबोळी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रताप देशमुख व भाजपाचे पदाधिकारी सर्व २५ नगरसेवक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामुळे सभेचे महत्त्व आणि गांभीर्य अनेक पटींनी वाढले. निवडणुकीच्या वातावरणात उत्साहाचे इंजेक्शन या भव्य सभेमुळे भाजपाच्या प्रचाराला मोठी चालना मिळाली आहे. विशेषतः मुस्लिम समाजातून मिळणारा पाठिंबा ही निवडणूक रंगतदार आणि उत्साहवर्धक बनवत आहे. जिंतूर नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर ही सभा भविष्यातील राजकीय समीकरणांवर नेमका काय परिणाम घडवते, हे आगामी दिवसांमध्ये पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.



## गुंठेवारीच्या मालमत्तावर फेर लावण्याची प्रक्रिया सुरु करा- आ.डॉ.राहुल पाटील

**परभणी,/प्रतिनिधीः** परभणी शहरातील गुंठेवारीने खरेदी केलेल्या मालमत्तांवर फेर लावण्याची प्रक्रिया सुरू करा अशी मागणी आ. डॉ.राहुल पाटील यांनी महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांच्याकडे केली आहे.



परभणी शहरातील अनेक भागांमध्ये विशेषतः झोपडपट्टी भागात गुंठेवारीने नागरिकांनी मालमत्ता खरेदी केलेल्या आहेत. यापूर्वी खरेदीखत असणाऱ्या मालमत्तांवर फेर लावण्याची प्रक्रिया महानगरपालिकेत सुरू होती. परंतु मागील दोन वर्षांपासून ही प्रक्रिया बंद करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. फ र लावला जात नसल्याने बँक व घरकुलांची कामे ठप्प झाली आहेत. यामुळे महापालिकेने गुंठेवारी असलेल्या मालमत्तांवर फेर लावण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करावी अशी मागणी आमदार डॉ.पाटील यांनी महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांच्याकडे केली आहे. डिसेंबर २०२० पूर्वी ज्या मालमत्तांची खरेदी झालेली आहे. आणि ज्यांचे खरेदीखत आहेत अशा मालमत्तांवर फेर लावता येतो परंतु महानगरपालिकेने मनमानी पद्धतीने दोन वर्षापासून फेर लावण्याची प्रक्रिया बंद केल्याने नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे. अनेक नागरिकांनी आमदार पाटील यांच्याकडे तक्रार केल्यानंतर आमदार पाटील यांनी याबाबत आयुक्तांशी संपर्क साधून फेर लावण्याची प्रक्रिया सुरू करण्याची मागणी केली आहे. त्यावर आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच याबाबत निर्णय घेऊन फेरफार लावणे सुरू करू असे सांगितले.




**परभणी- गंगाखेड नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित मतदान जनजागृती मोहिमेत नवदांपत्याचा उत्स्फूर्त सहभाग शहरातील एका नवदांपत्याने या उपक्रमात सहभागी होत लोकशाही प्रक्रियेबद्दलची जाणीवपूर्वक बांधिलकी अधोरेखित केली. अफवा टाळा, प्रक्रियेवर विश्वास ठेवा आणि मतदान जरूर करा'' असा थेट संदेश त्यांनी नागरिकांना दिला. त्यांच्या या सहभागामुळे तरुण मतदारांमध्येही सकारात्मक वातावरण निर्माण झाले. नवजीवनाला सुरुवात करतानाच समाजाप्रती कर्तव्य जपणारे हे उदाहरण गंगाखेडमध्ये चर्चेचा विषय ठरले आहे.श्री. अभिजित दिलीप तामखाने सौ. वैष्णवी अभिजित तामखाने जैदीपुरा, रा. गंगाखेड या दाम्पत्यांने मतदार जनजागृतीमध्ये सहभाग नोंदवून मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले.**

## संतोष मुरकुटे लोकांची सेवा करण्यासाठी राजकारणात आले- पालकमंत्री साकोरे

**शांतीलाल शर्मा**

**पालम ,/प्रतिनिधी-** संतोष मुरकुटे व त्यांचा परिवार लोकांचीसेवा करण्यासाठी अहोरात्र काम करीत आहेत. संतोष भाऊ कितीही कठीण समस्या असो प्रत्येक वेळी चेहर्यावर स्मीत हास्य ठेवत लोकांच्या अडचणी सोडवत असतात त्यामुळे त्यांचे आई वडिलांनी ठेवलेले संतोष हे नाव सार्थ ठरवितात असे प्रतिपादन राज्याच्या मंत्री व परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी पेठशिवणी येथे भाजप जिल्हाध्यक्ष संतोषभाऊ मुरकुटे यांच्या वाढ दिवसानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात केले.



यावेळी संतोष मुरकुटे यांच्या वडिल त्र्यंबकराव मुरकुटे यांनी मुलाच्या कार्याचा आढावा घेत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व जनतेने संतोषला आशीर्वाद दिले तर तो जनतेच्या प्रत्येक अडचणीवर मात करून त्यांची सेवा करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी वाढदिवसा निमित्त च्या सत्काराला उत्तर देताना संतोषभाऊ मुरकुटे यांनी पेठशिवनी सर्कलच्या सर्व समस्या मला माहित आहेत,येथील जनतेने जर मला आशीर्वाद दिले तर या सर्कलमधे पिण्याच्या पाण्याची समस्या, सर्व गावातील रस्ते,तसेच या सर्कलमध्ये प्रसिद्ध असलेल्या प्रमुख तीन मंदिरांसाठी सरकार कडून निधी खेचून आणून व संपूर्ण पेठशिवणी सर्कलच्या समस्या प्रामुख्याने सोडविण्याचे आश्वासन दिले.तसेच मी राजकारणी नाही, मला देवाने काहीच कमी केलेले नाही, परंतु गोरगरीब जनतेची सेवा करण्या करता राजकारणा शिवाय दुसरा चांगला पर्याय नसल्याने मी राजकारणात आलो आहे. असे प्रतिपादन केले. तर प्रमुख मान्यवराणी संतोष मुरकुटे यांचे कौतुक केले. यावेळी विशेष अतिथी म्हणून मराठवाड्याचे संघटन मंत्री संजय कौडगे,मा. आमदार गोविंद केंद्रे, भाजप प्रदेश सचिव किरण पाटील, देविदास राठोड,ग्रामीण जिल्हाध्यक्ष भाजपा सुरेश भुमरे, गणेशराव रोकडे दादा, प्रेरणाताई वरपूडकर,भाई ज्ञानोबा मुंडे, राम प्रभू मुंडे, डॉ. केदार खटिंग, लक्ष्मणराव रोकडे, बालाजी देसाई, डॉ, सुभाष कदम, बालाजी खैरे,नारायण पिसाळ, विठ्ठलराव रबदडे मामा, लिंबाजीराव टोले,भरत घनदाट, रंगनाथ सोळंके, व्यंकटराव तांदळे,सविता ताई गायकवाड,श्रीनिवास मुंडे, प्रणित खजे, सारीका ताई पारवे,गोपीनाथ तुडमे,सदाशिव आप्पा ढेले, गौतम हात्तीअंबिरे, नंदकिशोर बल्लोरे, रुपेश शिनगारे, मल्लिकार्जुन लांडगे, पांडुरंग रोकडे, रवी जोशी,संजय मोहिते, सह अनेक मान्यवरा सह मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त...



### अरण्य गोवर्धन मठात दत्त जयंती साजरी

**तुळजापूर, दि.४ डिसेंबर -**

अरण्य गोवर्धन मठात दत्त जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अरण्य गोवर्धन मठाचे महंत व्यंकट अरण्य महाराज, नगरसेवक माऊली भोसले आदिंची प्रमुख उपस्थिती होती. दत्त जयंती निमित्त सकाळी पंचामृत अभिषेक पुजा, दुपारी दत्त जन्म, महाआरती करण्यात आली. तर महाप्रसादाने दत्त जयंती उत्सवाची सांगता करण्यात आली.



### तुळजापूरकरांचे महाविकास आघाडीतर्फे आभार व्यक्त

**तुळजापूर, दि.४ डिसेंबर -**

तुळजापूर नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेल्या मतदारांच्या जनसमर्थनाबद्दल आभार व्यक्त करण्याकरिता नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अमर मगर यांनी पत्रकार परिषद घेतली. महाविकास आघाडीतर्फे आयोजित पत्रकार परिषदेसाठी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड. धीरज पाटील, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अमर मगर, नगरसेवक पदाचे उमेदवार अमोल कुतवळ, भाऊ भांजी, सुधीर कदम, भारत कदम, नरेश पेंदे, श्याम पवार, उत्तम अमृतराव, तोफिक शेख, सुदर्शन वाघमारे आदींची उपस्थिती होती. महाविकास आघाडीचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समर्थकांचेही आभार मानत जनतेने दाखवलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. तुळजापूरच्या सर्वांगीण विकासासाठी महाविकास आघाडी कटिबद्ध असल्याचे कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड. धीरज पाटील यांनी सांगितले. याप्रसंगी अमोल कुतवल, उत्तम अमृतराव, भाऊ भांजी यांनीही जनतेचे आभार व्यक्त केले.

# नळदुर्ग-अक्कलकोट रस्ता पुन्हा खड्ड्यांनी भरला!

### वाहनचालक त्रस्त, अपघातांची भीती...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ डिसेंबर -**





नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्याची पुन्हा एकदा मोठी दुरावस्था झाली असून या रस्त्यावर सध्या ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे हा रस्ता वाहनचालक व प्रवाशांसाठी 'मृत्यूचा सापळा' बनण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

तुळजापूर-नळदुर्ग-अक्कलकोटला जोडणारा हा रस्ता नळदुर्ग शहराच्या विकासासाठी महत्त्वाचा असून प्रवासासाठीही सर्वात सोयीचा मार्ग आहे. मात्र संबंधित विभागाकडून या रस्त्याकडे कायम दुर्लक्ष होत असल्याची स्थानिकांची नाराजी आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून हा रस्ता चांगला नव्हता, इतकेच नव्हे तर कधी काळी तो रस्ता कमी आणि खड्डे जास्त असल्याने खड्ड्यांचा रस्ता म्हणूनच ओळखला जात होता. खड्ड्यांमधून रस्ता शोधावा लागेल एवढी त्याची अवस्था होती. त्यामुळे सामान्य वाहतुकीसाठी हा रस्ता जवळपास बंदच झाला होता. त्या काळात फक्त एस.टी. बसनेच धाडस करून या मार्गावरून वाहतूक सुरू ठेवली होती.

तुळजापूरहून नळदुर्गमार्गे अक्कलकोटला जाणाऱ्या भाविकांना खराब रस्त्यामुळे मार्ग बदलून इटकळमार्गे प्रवास करावा लागत होता.

रस्त्याची दयनीय अवस्था पाहून आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून दिल्यानंतर गेल्या उन्हाळ्यात या रस्त्याचे काम करण्यात आले होते. मात्र काही महिन्यांतच रस्त्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून परिस्थिती पुन्हा पूर्ववत झाली आहे.

सध्या नळदुर्ग हद्दीत ठिकठिकाणी खोल आणि मोठे खड्डे पडले आहेत. लहान चारचाकी वाहनांना या खड्ड्यांतून पुढे जाणे कठीण होत असून वाहने नुकसान होण्याचे प्रमाण वाढले आहे.

या दुरावस्थेसाठी जड वाहने, उसबाजारातील गाड्यांची मोठ्या प्रमाणात होणारी जा-ये ही प्रमुख कारणे असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. हा रस्ता नळदुर्गच्या वाणिज्य, पर्यटन आणि भाविकांच्या वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. तुळजाभवानीचे दर्शन घेऊन पुढे श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी जाणारे भाविक या मार्गानेच अक्कलकोटकडे जातात. यापैकी अनेक भाविक नळदुर्गचा ऐतिहासिक किल्ला पाहण्यासाठीही थांबतात. त्यामुळे हा रस्ता चांगल्या स्थितीत असणे अत्यावश्यक आहे.

सध्या रस्त्याची मोठी दुरावस्था झाल्याने वाहनचालक, प्रवासी आणि रस्त्यालगतच्या गावातील नागरिकांनी तातडीने दुरुस्ती सुरू करण्याची मागणी संबंधित विभागाकडे केली आहे. रस्ता आणखी खराब होण्यापूर्वी काम हाती घेणे आवश्यक असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

## घाटंग्रीत कुटुंबातील वादातून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

घाटंग्री येथे कुटुंबातील वादातून सहा जणांनी मिळून एका व्यक्ती व त्याच्या कुटुंबीयांना मारहाण केल्याची गंभीर घटना २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी घडली.



आरोपी गोकुळ खेमा राठोड, दिलीप खेमा राठोड, अदित्य गोकुळ राठोड, अजिंक्य गोकुळ राठोड, निता उर्फ चिका दिलीप राठोड व चावळाबाई खेमा राठोड (सर्व रा. घाटंग्री) यांनी सकाळी ७.१५ वाजता फिर्यादी सागरसिंह महादेव राठोड (वय ३१, रा. घाटंग्री तांडा क्र. १) तसेच त्यांच्या आई, भाऊ व बहिणीवर गैरकायदेशीर जमाव जमवून हल्ला केला.

आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी, लोखंडी रॉड व काठीनं मारहाण केली तसेच चावा घेऊन जखमी केल्याचे वैद्यकीय जबाबात नमूद आहे.

सागरसिंह राठोड यांनी ३ डिसेंबर रोजी दिलेल्या जबाबावरून धाराशिव ग्रामीण पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

## उपळाईतील शेतकऱ्याचा मुलगा करणार देशाचे रक्षण

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.४ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील उपळाई या गावातील अल्पभूधारक शेतकरी बाजीराव (बाबा) मनोहर फावडे यांचा मुलगा धीरज याने अग्निवीर भरती प्रक्रियेत भारतीय सैन्य दलात नाव नोंदवत उपळाई गावाचे नाव उज्वल केले आहे. भरतीची बातमी धीरजला समजली, तेव्हा तो गावातील दुसऱ्याच्याच शेतात कुळपणीचे काम करत होता. घरची अत्यंत हालाखीची परिस्थिती, आई सुरेखा फावडे यांचा भाजी विक्रीचा व्यवसाय आणि त्यातून भागवलेला मुलाचा शिक्षण खर्च या सर्व अडचणींवर मात करत धीरजने मिळवलेले यश गावासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.



उपळाई ग्रामपंचायतकडून नागरी सत्कार...

या आनंदाच्या क्षणी उपळाई ग्रामपंचायतीकडून धीरज फावडेचा भव्य नागरी सत्कार आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास गावातील नागरिकांसह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच बापूसाहेब मुंडे यांच्या हस्ते धीरजचा सन्मान करण्यात आला.

यावेळी सूर्यभान फावडे, अर्जुन हरभरे, मेजर लक्ष्मण मुंडे, मेजर शिवशंकर वनवे, भीमराव शेंडगे, सुधाकर दराडे, अण्णासाहेब शेंडगे, कैलास मुंडे, राहुल मुंढे, बाळासाहेब मुंडे, किशोर वनवे, राहुल शेंडगे, बाबासाहेब वनवे सर, हनुमंत वनवे, सदाशिव फावडे, राम मगर, विष्णू मुंडे, धोंडीबा केकान आदी मान्यवर उपस्थित होते.

गावातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील मुलाने आपल्या मेहनतीच्या जोरावर भारतीय सैन्यात प्रवेश मिळविल्याने ग्रामस्थांनी आनंद व समाधान व्यक्त केले.

## तुळजापूर पेठेतील चौकातून मारुती इको कार चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

> **तुळजापूर पोलिस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा**

शुक्रवार पेठ परिसरातील बोंबले हनुमान चौकातून एका व्यक्तीची मारुती सुझुकी इको कार चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे.

जलील रहेमान शेख (वय ५२, रा. शुक्रवार पेठ) यांची अंदाजे १ लाख रुपये किंमतीची एमएच-१२-एचझेड-०७०७ क्रमांकाची इको कार २ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजल्यापासून ३ डिसेंबर रोजी पहाटे ३ वाजेपर्यंतच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

या संदर्भात जलील शेख यांनी ३ डिसेंबर रोजी तुळजापूर पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भा.दं.सं. कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## डॉक्टर अन् शिक्षक हे कधीच सेवानिवृत्त होत नसतात : डॉ. सिद्रामप्पा खजूरे

### आदर्श सेवानिवृत शिक्षक पुरस्काराचे थाटात वितरण

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.४ डिसेंबर -**

समाजात सर्व जन एका विशिष्ठ वयोमर्यादेला सेवानिवृत्त होतात पण शिक्षक अन् डॉक्टर यांना सेवानिवृत्त होता येत नाही म्हणजेच सेवानिवृत्तीनंतर ही समाजाची सेवा या दोन घटनांना करावीच लागते. आपल्या वडिलांच्या पुण्य स्मरण दिनानिमित गेली ९ वर्ष सातत्याने सेवानिवृत्त शिक्षकांना पुरस्कार देण्याचे काम दत्तात्रय अणदूरकर सामाजिक संस्था करीत आहे ही गोष्ट फार मोठी असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक डॉ सिद्रामप्पा खजूरे यांनी केले.

ते अणदूर येथे दत्तात्रय अणदूरकर सामाजिक संस्थेच्या वतीने आदर्श सेवानिवृत शिक्षक पुरस्कार समारंभात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून अणदूर गावचे उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार ग्रामपंचायत सदस्य डॉ. जितेंद्र कानडे.नळदुर्गचे माजी नगरसेवक विनायक अहंकारी, पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त शिक्षक शिवाजी घुगे गुरुजी, संस्थेचे अध्यक्ष पत्रकार श्रीकांत अणदूरकर यांची मंचावर उपस्थिती होती.

प्रथमतः कै. दत्तात्रय अणदुरकर गुरुजी यांच्या प्रतिमेची पूजन करण्यात आले. सर्व सन्माननीय मान्यवरांचा सन्मान करून सेवानिवृत्त पुरस्काराचे मानकरी ठरलेले शिवाजी घुगे गुरुजी यांना फेटा, शाल, श्रीफळ व प्रशस्तीपत्र देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी आदर्श सेवानिवृत्त शिक्षक शिवाजी घुगे गुरुजी, विनायक अहंकारी, डॉ. जितेंद्र कानडे, सीमा जोशी, डॉ.नागनाथ कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास बापू कुलकर्णी, शिवाजी कांबळे, नागेश करपे, लक्ष्मण नरे, डॉ. हरिदास मुंडे,



अविनाश मोकाशे, मल्लिकार्जुन नरे, अभय तोगी, काशिनाथ करपे, करबसपा धमुरे, अनिल घुगे, प्रवीण घोडके, आण्णासाहेब आलुरे, प्रकाश मोकाशे, खडकाळी मॉर्निंग क्लबचे सदस्य, ८ फार्मा ग्रुपचे सदस्य, जयमल्हार पत्रकार संघाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार दयानंद काळुंके यांनी तर सूत्रसंचलन एम.बी. बिराजदार यांनी केले,संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत अणदुरकर यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बंडू तोगी, शिवशंकर तिरगुळे, संजीव आलुरे, आदींनी परिश्रम घेतले.

## सुयश आडेची राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड

### जयप्रकाश विद्यालयात सत्कार सोहळा संपन्न...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील इयत्ता ११ वी (विज्ञान शाखा) मधील विद्यार्थी सुयश संजय आडे याची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाल्याने विद्यालयात त्याचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे यांनी भूषविले. महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे यांच्या वतीने क्रीडा संकुल, बारामती येथे नुकत्याच आयोजित राज्यस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत सुयश आडे यांनी १७ वर्षे वयोगटात प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्याची आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली असून या स्पर्धा मध्य प्रदेश येथे होणार आहेत.



सत्कार समारंभात मान्यवरांच्या हस्ते सुयश आडे यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला तसेच भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमास माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोहारा पोलिसांकडून अवैध दारू जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

लोहारा पोलीसांनी अवैध मद्यविक्रीवर कारवाई करताना २६ सिलबंद दारूच्या बाटल्या जप्त केल्या असून एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, आरोपी दगडु संगप्पा ववांडे (वय ५५ वर्षे, रा. विलासपुर पांढरी, ता. लोहारा, जि. धाराशिव) हे दि.०३.११.२०२५ रोजी सायंकाळी सुमारे ६.१० वाजता लोहारा- विलासपुर पांढरी रोडवरील बसस्थानकाजवळ अवैध विक्रीसाठी दारू बाळगत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली.

त्यानुसार पोलीसांनी त्या ठिकाणी धाड टाकून अंदाजे १,३०० रुपये किंमतीच्या देशी-विदेशी मद्याच्या २६ सिलबंद बाटल्या जप्त केल्या.

## दिव्यांगांना अंत्योदय योजनेत समाविष्ट करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.४ डिसेंबर -**

> **संघटनेकडून तहसिल कार्यालयात निवेदन**

कळंब तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय अन्न योजना अंतर्गत शिधापत्रिकेत समाविष्ट करून त्यांना धान्य उपलब्ध करून द्यावे, तसेच पेन्शन वाढीसह इतर सुविधा द्याव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी मानव अधिकार आंदोलन संघटनेकडून जागतिक दिव्यांग दिनानिमित्त (३ डिसेंबर) तहसिल कार्यालयात निवेदन देण्यात आले.

१९९२ पासून संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने ३ डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन जाहीर करण्यात आला असून दिव्यांग व्यक्तींबाबत जाणीव वाढविण्याच्या उद्देशाने हा दिवस जगभर साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर संघटनेने तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागाच्या नायब तहसीलदार माळवे यांना निवेदन सादर केले.

निवेदनात पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत कळंब तालुक्यातील सर्व दिव्यांग व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना नवीन शिधापत्रिकेत किंवा विद्यमान शिधापत्रिकेत अंत्योदय योजनेत समाविष्ट करावे. अंत्योदय योजनेंतर्गत हक्काचे धान्य नियमित उपलब्ध करून द्यावे. संजय गांधी निराधार योजनेतील सध्या मिळणारी २५०० रूपये मासिक पेन्शन वाढवून ६००० रूपये करण्यात यावी. ग्रामपंचायतीमार्फत दिला जाणारा ५% दिव्यांग निधी तात्काळ प्रदान करावा तसेच हा निधी वाढवून १०% करण्यात यावा. तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांचा दारिद्र्यरेषा सर्वे पूर्ण करून त्यांना दारिद्र्यरेषेखाली समाविष्ट करावे.

संघटनेने मागण्यांवर तातडीने योग्य ती कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा प्रशासनाला दिला आहे.

निवेदनावर हनुमंत पाटुळे, राजाभाऊ गायकवाड, मारुती वाघमारे, भारत कदम, भिवाजी ताकपिरे, प्रवीण कसबे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## येरमाळा : राज्यस्तरीय तज्ज्ञ पथकाची आरोग्य केंद्रांना भेट; सेवांच्या गुणवत्तेचे सखोल मूल्यमापन

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.४ डिसेंबर -**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमधील आरोग्य सेवेचे सर्वंकष मूल्यांकन करण्याची महत्त्वपूर्ण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. नॅशनल हेल्थ सिस्टीम्स रिसोर्स सेंटर (NHSRC), नवी दिल्ली आणि इंडियन असोसिएशन ऑफ प्रिव्हेंटिव्ह अँन्ड सोशल मेडिसीन (IPSM²) यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील आरोग्य सेवेच्या गुणवत्तेचे मूल्यांकन हा उपक्रम राज्यभर सुरू आहे.

या अंतर्गत राज्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, तज्ज्ञ डॉक्टर आणि प्रशिक्षित अधिकारी अशी विशेष पथके जिल्ह्यातील आरोग्य संस्थांना भेट देत आहेत. गुरुवारी (ता. ४) या पथकाने पाथकानी येरमाळा प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. त्यानंतर आज येरमाळा प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच पानगाव-रत्नापूर उपकेंद्राची सखोल पाहणी करण्यात आली.



भेटीदरम्यान आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ.एस.डी. बिरादार, औषध निर्माता के.बी. गुरव, कक्ष अधिकारी बी.आर. स्वामी, एल.टी एस.एस. कराड, एच.ए.आर.एस. हाजगुडे, एल.डी.ओ. कृष्णा मोरे, ए.डी. वाघमारे, ए.एस. देशमुख, एल.एच.व्ही.एस.डी. गिरी, स्टाफ नर्स अशा रोडगे, ए.एन.एम. माया सुतार, तसेच आशा सेविका आणि कार्यकर्त्या-ज्योती बारसकर, जावळे, गुरव, जाधव-यांच्याशी संवाद साधून दैनंदिन कामातील अडचणी, सेवा पुरविताना येणारे अडथळे आणि रुग्णांच्या गरजांसंबंधी माहिती घेतली.

पथकाने रुग्ण नोंदवही, औषध साठा व वितरण नोंदी, लसीकरण कार्यक्रम, प्रसूती सेवा, कुपोषण निवारण व तपासणी सुविधा, प्रयोगशाळेतील साधनसामग्री, स्वच्छता व्यवस्था, पायाभूत सुविधा आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी यांचे बारकाईने परीक्षण केले.

विशेषतः मातृ-शिशू आरोग्य सेवा, एड्स प्रतिबंधक कार्यक्रम, क्षयरोग निर्मूलन मोहिम, तसेच गैर-संसर्गजन्य आजारांच्या तपासणी संदर्भातील कार्यप्रणालीची तपशीलवार छाननी करण्यात आली.

यावेळी उपलब्ध सुविधा, कर्मचाऱ्यांची कार्यतत्परता आणि सेवा सुधारण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची पथकाने प्रशंसा केली. काही तांत्रिक व पायाभूत सुविधांच्या उन्नतीसाठी आवश्यक सूचना करत मार्गदर्शनही केले.

या मूल्यांकन उपक्रमाचे अहवाल NHSRC व IPSM² यांच्या तज्ज्ञ समितीकडे पाठविले जाणार असून, त्याआधारे जिल्हा आणि राज्य पातळीवरील आरोग्य सेवा अधिक परिणामकारक, गुणवत्तापूर्ण आणि रुग्ण-केंद्रित करण्यासाठी पुढील धोरणे आखली जाणार आहेत.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवेची गुणवत्ता उंचावण्यास निश्चितच मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. येरमाळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील कामकाज सुरळीत असल्याचे समाधान पथकाने व्यक्त केले असून कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हाधिकाऱ्यांची वरूड चक्रपान, कवठा गावाला भेट, विविध विभागाची तपासणी







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ डिसेंबर**

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज सेनगाव तालुक्यातील वरुड चक्रपान येथे ग्राम पंचायत सभेत उपस्थित राहून नागरिकांना शासनाच्या विविध योजना, अतिवृष्टी अनुदान, ई-केवायसी, सेवादूत ॲप, आपलेसेवा तक्रार निवारण प्रणाली आदींबाबत सविस्तर माहिती दिली. शासनाच्या सर्व सेवांचा लाभ जलद, पारदर्शक आणि प्रभावीपणे मिळावा, यावर त्यांनी भर दिला.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी वरुड चक्रपान येथील जिल्हा परिषद शाळा व आरोग्य उपकेंद्राला भेट देऊन पाहणी केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) केशव गड्डापोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा) संजय कुलकर्णी, शिक्षणाधिकारी आसावरी काळे, तहसीलदार सखाराम मांडवगडे तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

गावात प्लास्टीकमुक्त अभियान राबवण्याचे तसेच ६ व १३ डिसेंबर रोजी शाळा व गाव परिसरात स्वच्छता उपक्रम आयोजित करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले. त्यानंतर जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सेनगाव तालुक्यातील कवठा येथील जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र व पशुवैद्यकीय दवाखान्याची पाहणी करून विविध शासकीय सेवा आणि सुविधा नागरिकांपर्यंत कार्यक्षमतेने पोहोचत आहेत की नाही याची माहिती घेतली.

हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कृषि योजना, रस्ते, पाणीपुरवठा योजना, घरकुल आवास योजना, नरेगा कामे, पानंद रस्ते, पंतप्रधान आदर्श ग्राम योजना, दलित वस्ती सुधारणा कामे, स्वच्छ भारत अभियान, आदिवासी आश्रमशाळा, समाजकल्याण वसतीगृहे, लपा तलाव, कोल्हापुरी बंधारे, रेशन दुकान तपासणी, सामाजिक अर्थसहाय्य योजना, अभा कार्ड, उमेदच्या महिला बचत गटांच्या योजना इत्यादी विविध योजनांची अंमलबजावणी शासन निकषांनुसार होत आहे किंवा नाही याचा आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषदेचे सर्व विभागप्रमुख आणि गटविकास अधिकारी यांनी वरुड चक्रपान, कवठा, म्हाळसापूर, भानखेडा, हत्ता आणि साखरा या गावांमध्ये संयुक्तपणे तपासणी केली.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांमार्फत या गावांमधून राबविण्यात आलेल्या योजनांची तपासणी करून त्याचा तातडीने अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या अहवालानंतर त्या गावांमधून सरप्राईज व्हीजीट देऊन अहवालानुसार कामे झाले किंवा नाहीत याची तपासणी केली जाणार असल्याचे सांगितले.

# शिक्षकांच्या शाळा बंद आंदोलनाला १०० टक्के प्रतिसाद

## शिक्षणाधिकाऱ्यांना दिले निवेदन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ डिसेंबर**

राज्यातील सर्व शिक्षक संघटनांच्या समन्वयाने ५ डिसेंबर रोजी सामुहीक रजा देत शिक्षकांनी शाळा बंद आंदोलन पुकारले या आंदोलनाला १०० टक्के प्रतिसाद मिळाला असून मागण्या मान्य न झाल्यास येत्या हिवाळी अधिवेशनावर शिक्षकांचा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे संघटनेच्यावतीने सांगण्यात आले आहे.

शिक्षकांना टीईटी परीक्षा देण्याचा घेतलेला निर्णय मागे घ्यावा,अन्यायकारक संचमान्यता, रद्द करून यासाठी विद्यार्थी पट संख्येची अट शिथिल करावी, अंशतः अनुदानित या सह सर्वच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांना जुनी पेन्शन लागू करावी, शिक्षकेतर कर्मचारी यांना आश्वाशीत प्रगती योजना लागू करावी, स्वयंम अर्थसहाय्यीत शाळांना मान्यता देणे बंद करून मराठी शाळा वाचवाव्यात, शिक्षण विभागातील सर्व शिक्षक शिक्षकेतर रिक्त पदे तात्काळ भरावीत, सरसकट पदवीधर वेतनश्रेणी, वस्तीशाळा शिक्षकांची मागील सेवा गृहीत धरून त्यांना कायम करावे यासह अन्य प्रमुख मागण्यांसाठी राज्यभर शिक्षकांनी सामुहीक रजा घेत शाळा बंद आंदोलन पुकारले होते. या आंदोलनाला जिल्ह्यात १०० टक्के प्रतिसाद मिळाला आहे. जिल्ह्यात आचार संहिता लागू असल्यामुळे शिक्षकांना मोर्चा काढता आला नाही. यावेळी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ प्रकाश अंभोरे म्हणाले की, शिक्षक पात्रता चाचणी उत्तीर्ण होणे अनिवार्य करून शिक्षकांना अडचणीत आणले जात आहे. भविष्यात या सक्तीने नोकरीमुक्त केले जाईल, अन्यायकारक संचमान्यतेच्या आडून शाळा शिक्षक अतिरिक्त ठरवून त्यांना डिसेंबर अखेरपर्यंत इतर जिल्ह्यात समायोजित करण्याचा डाव आखला जात आहे. दुसरीकडे दहा ते वीस पटाच्या आतील शाळेवर खाजगी कंपनीमार्फत कंत्राटी शिक्षक भरण्याचे नियोजन सुरू आहे. त्यातून सुद्धा शेकडो शिक्षक अतिरिक्त ठरतील. या सर्वांचे समायोजन करण्यासाठी जागाच उपलब्ध नसतील तर शेवटी कंटाळून त्याने नोकरीचा राजीनामा द्यावा. परिणामतः भविष्यात सर्व मराठी शाळा बंद पडतील हा धोका आहे.

यावेळी विविध मागण्यांचे निवेदन मुख्याध्यापक संघ, शिक्षक संघटनांच्यावतीने शिक्षणाधिकारी यांना सादर करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ प्रकाश अंभोरे, सचिव विठ्ठल सोळंके, मराठवाडा शिक्षक संघाचे नागनाथ सोळंके, श्रीमती एम एस गुंडेकर, संजय टाकळगव्हाणकर आदींची उपस्थिती होती.

# फुलेवाड्याचे खाजगीकरण थांबविण्याची जिजाऊ ब्रिगेडची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ डिसेंबर**

पुणे येथील महात्मा फुले वाडा हा भाडेतत्वावर चालविण्यास द्यावा, अशी मागणी समता परिषद या सामाजिक संघटनेने राज्यभर शासनाकडे केली आहे.हा 'वाडा देशाचा ऐतिहासिक ठेवा आहे आणि देशाचा 'प्रत्येक नागरिक हा त्याचा वारस आहे, त्यामुळे महात्मा फुले हे काही कोण्या जातीपुरते मर्यादित' नाही, हे लक्षात घेऊन ही प्रक्रिया थांबवावी, अशी मागणी शासनाकडे जिल्हाधिकारी राहूल गुप्ता मार्फत एका निवेदनाद्वरे जिजाऊ ब्रिगेडने केली आहे. शासन आणि पुरातत्व विभाग या वाड्याचे संगोपन करायला समर्थ आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला अथवा संघटनेला असे अधिकार देण्यात येऊ नयेत अन्यथा आंदोलन करण्याचा दिला इशारा दिला. राज्य सरकारनेच या वाड्याची देखभाल करावी. जिजाऊ ब्रिगिडच्या महिलांनी राज्यभरातून सांस्कृतिक कार्य मंत्रालयासदेखील यासाठी पत्रे पाठविली आहे. सद्यस्थितीत या वाड्यामध्ये कोणीही येऊ-जाऊ शकतो, स्वच्छंदपणे या वाड्यात वावरू शकतो. महिला जयंती, पुण्यतिथी अशा विशेष दिवशी येऊन महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांची स्तवने गातात. आपल्या भावना मुक्तपणे मांडतात. महिलांसाठी ते एक हक्काचे स्थान आहे. त्यामुळे महिलांच्या भावनांचा आदर ठेवून स्मारकाचे खासगीकरण थांबविण्यात यावे, अन्यथा राज्यभरात आंदोलन छेडले जाणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. निवेदन देताना प्रदेश उपाध्यक्ष ज्योतीताई कोथळकर, जिल्हाध्यक्ष प्रियंका भोयर, जिल्हा सचिव संजीवनी पडोळे, सहसंघटक मनिषा कऱ्हाळे, प्रचार व प्रसिध्दी प्रमुख कल्पना सोळंके, सहकोषाध्यक्ष मंगल वाघमरे, कार्याध्यक्ष सुरेखा जगताप, सहसचिव सारिका सोळंके यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होत्या.




**हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात बालविकास विभागाची बैठक जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी बालविवाह निर्मुलनासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### दावे हरकती साठी १८ डिसेंबरपर्यंत मुदत

औंढा नागनाथ- औंढा नागनाथ तालुक्यातील पदवीधर मतदार नोंदणीसाठी दावे व हरकती दाखल करण्यासाठी अठरा डिसेंबर २०२५ ची तारीख जाहीर झाली असल्याची माहिती पदनिर्देशीत अधिकारी तथा तहसीलदार हरिष गाडे यांनी दिली आहे. त्यासाठी औंढा नागनाथ, जवळा बाजार, साळणा, येहळेगाव सोळंके येथे चार मतदान केंद्रावर बिएलओ तथा मंडळ अधिकारी यांचे आदेश काढण्यात आले आहेत. कार्यालयीन वेळेत अर्ज दाखल करण्यासाठी उर्वरित पात्र पदवीधर यांनी अर्हता दिनांक पाहून अर्ज दाखल करावे, विहित नमुन्यातील अर्ज संबंधितांकडे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पासपोर्ट आकाराचे दोन फोटो, पदवीची झेरॉक्स प्रत, आधार कार्ड, मतदान कार्ड व अर्जावर सही करुन संबंधितांकडे अर्ज दाखल करावे असे आवाहन नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव यांनी केले आहे.

### कडोळी येथे मोफत दंत तपासणी शिबीर



हिंगोली- सेनगाव तालुक्यातील कडोळी येथील माऊली हॉस्पिटलमध्ये बुधवारी मोफत दंत आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरित्या पार पडले. माऊली हॉस्पिटलचे संचालक डॉ. भाकरे यांच्या पुढाकाराने, एकदंत डेंटल क्लिनिक गोरेगाव यांच्या सहकार्याने स्थानिक समुदायांमध्ये मौखिक आरोग्य आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हे शिबिर घेण्यात आले. एकदंत डेंटल क्लिनिकच्या संचालिका डॉ. आरुषी भट्ट, डॉ. प्रतीक्षा जैस्वाल आणि डॉ. नितीन शिंदे रूग्णांची तपासणी केली. शिबीरामध्ये परिसरातील ४० रूग्णांची सर्व समावेशक तपासणी करण्यात आली. शिबिरा दरम्यान, डॉक्टरांनी केवळ दातांच्या विविध समस्यांचेच निदान केले नाही तर तोंडाच्या स्वच्छतेच्या योग्य पद्धती, दातांच्या सामान्य आजारांपासून बचाव आणि उपलब्ध उपचार पर्यायांबद्दल रुग्णांना शिक्षित केले. या उपक्रमाला स्थानिक रहिवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला. शिबीराच्या यशस्वीतेसाठी डॉ. ज्ञानेश्वर भाकरे व डॉ. शुभम थोरात यांनी परीश्रम घेतले.

### ७ डिसेंबरला हिंगोलीत मणिकर्णिका वॉकेथॉन

हिंगोली- राष्ट्रसेविका समितीच्यावतीने महाराणी लक्ष्मीबाई यांच्या १९७ व्या वर्षपूर्ती निमित्त दि ७ डिसेंबर रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत मणकर्णिका वॉकेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील शिवाजी नगर भागातील सिटी क्लब पासून या स्पर्धेला सुरूवात होणार आहे. स्पर्धकांना ३ किमीचे अंतर चालावे लागणार आहे तसेच राणी लक्ष्मीबाई यांची आकर्षक वेशभूषा स्पर्धा असून विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण होणार आहे.९

# बहारदार कवितांनी रंगले कवीसंमेलन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ डिसेंबर**

मराठवाडा साहित्य परिषदेच्या हिंगोली शाखेतर्फे आयोजित मासिक कवी संमेलनात विविध काव्यप्रकारांनी रंगतदार वातावरण निर्माण झाले.

ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ज्येष्ठ कवी रतन आडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय नाकाडे उपस्थित होते.यावेळेस म.सा.प. हिंगोली शाखेतर्फे दिवंगत साहित्यिक मिर्झा बेग यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी कवी गोडाती काळे, गणेश येवले, रतन आडे, श्रीमती सुमन दुबे, डॉ राधिका देशमुख, पारिजात देशमुख, रघुनाथ घुगे, रघुवीर पतंगे यांनी विविध विषयांवर बहारदार कविता सादर केल्या. करण हरण आणि मनोहर दीपके यांनीही आपल्या रचना सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.कविता ही निरंतर बदलाची प्रक्रिया असून समांतर साहित्यिक मूल्यांमुळे सकस समाजनिर्मिती होते, असे मत मसापचे अध्यक्ष अशोक अर्धापुरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश येवले यांनी केले, तर आभारप्रदर्शन गोडाती काळे यांनी केले. या कवीसंमेलनासाठी मराठवाडा साहित्य परिषदेच्या पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# श्री दत्त जयंतीनिमित्त औंढ्यातील दत्त मठात दिपोत्सव सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ डिसेंबर**

औंढा नागनाथ शहरातील आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ मंदिराच्या बाजूस असलेल्या दत्त मठामध्ये दत्त जयंती निमित्त अकराशे दिवे लावून दिपोत्सव व श्री दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी दत्त मंदिर फुलांनी सजविण्यात आले होते. तसेच जागोजागी रांगोळ्याही काढण्यात आल्या होत्या. तसेच दत्त मठामध्ये अकराशे दिवे लावून दिपोत्सव ही साजरा करण्यात आला. फटाक्यांची आतषबाजी करत दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला. श्रीदत्त कथेचे वाचन लक्ष्मीकांत जोशी यांनी केले.यावेळी भक्तांनी दत्तांचा जयघोष केला. तसेच नगराध्यक्ष कपिल खंदारे व उपनगराध्यक्ष मनोज देशमुख यांनी दत्त मठामध्ये जाऊन प्रभु दत्तात्रयाचे मनोभावे पूजा करून दर्शन घेतले. दत्त जन्मोत्सवानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी महंत शाम गिरी महाराज, दत्ता मठाचे उत्तराधिकारी राजू गिरी, बबन सोनूने, महेश जोशी, प्रशांत स्वामी, राम गिरी बसवेश्वर स्वामी, राजू स्वामी, शिवशंकर पोले श्रेयश जोशी, भगवान शिंदे बाळू देशमुख, विजय ठाकूर, प्रकाश भारती, गजानन पाठक, रवी देशपांडे, सचिन देशमुख, मुकेश पडोळे कैलास देशमुख, बंडू सोनूने, लक्ष्मण स्वामी, योगेश गोरे, राजू गोरे यांच्यासह भक्तगणाची उपस्थिती होती. दत्त जन्मोत्सव झाल्यानंतर फटाक्याची आतिषबाजी करण्यात आली.

# जिल्ह्यात बालविवाह निर्मुलनासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ डिसेंबर**

जिल्ह्यात बालविवाह निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ नुसार जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा कृती दल, प्रतिपालकत्व व प्रायोजकत्व, बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दल व बाल कल्याण समिती यांची त्रैमासिक आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी विविध योजनांची अंमलबजावणी, जनजागृती उपक्रम आणि बाल संरक्षण कार्याचा विस्तृत अहवाल सादर करण्यात आला.

या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी गुप्ता म्हणाले की, जिल्ह्यात निवडलेल्या ४५ हॉटस्पॉट गावांमध्ये बालविवाह पूर्णपणे थांबवण्यासाठी ग्रामपंचायत व धार्मिक स्थळांच्या भिंतीवर जनजागृती संदेश आणि १०९८ चाइल्ड हेल्पलाईन क्रमांकाचे प्रसारण करावे. आरोग्य विभागाच्या तपासणीत आढळलेल्या ८१ किशोरवयीन मातांचे सर्वेक्षण करून त्यांच्या विवाहांची सखोल माहिती गोळा करावी तसेच संबंधित प्रकरणात कायदेशीर कारवाई करावी.

किशोर मातांचे समुपदेशन करून शिक्षणाच्या प्रवाहात पुनर्वसन करणे, शासनाच्या विविध योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे, आवश्यक प्रशिक्षण देणे आणि त्यांना सक्षम करण्यासाठी कार्यपद्धती तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले. आरोग्य विभागाने सर्व किशोरवयीन मातांचा तपशीलवार विदा (डेटा) तयार करावा तसेच प्रत्येक गावात ग्राम बाल संरक्षण समितीमार्फत विवाहांची अनिवार्य नोंदणी सुनिश्चित करावी. बालविवाह प्रतिबंधासाठी मुलींचा जन्मापासून विवाहापर्यंतचा संपूर्ण विदा तयार करण्याची कार्यपद्धती निश्चित करावी. जागतिक बालिका दिनानिमित्त सर्व शाळांमधील विद्यार्थिनींकडून 'बालविवाह करू नका' असा भावनिक संदेश असलेली पत्रे वडिलांना लिहिण्याचा उपक्रम राबवण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या. बैठकीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि सदस्य सचिव एस.आर. दरपलवार यांनी कामकाजाचा आढावा सादर केला.

या बैठकीस डॉ. बालाजी भाकरे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक बाळासाहेब झिंजाडे, युनिसेफचे वरिष्ठ प्रकल्प समन्वयक बाळू राठोड, प्रकल्प समन्वयक मोनाली धुर्वे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष सुधाकर इंगोले, कायदा व परिविक्षा अधिकारी ॲड. अनुराधा पंडीत, चाईल्ड हेल्पलाईन प्रकल्प समन्वयक संदीप कोल्हे, प्रा. किशोर इंगोले व अन्य कर्मचारी, समितीचे सदस्य उपस्थित होते.

# १३ डिसेंबरला राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ डिसेंबर**

येथील जिल्हा व सत्र न्यायालयात व त्या अंतर्गत येणाऱ्या हिंगोली जिल्ह्यातील तालुक्यातील विविध न्यायालयात महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशानुसार तालुका विधी सेवा समिती व वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा न्यायालय परिसरात व जिल्ह्यातील तालुक्यातील विविध न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या लोकअदालतीमध्ये भूसंपादन व मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, तडजोडयुक्त फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, वैवाहिक/ कौटुंबिक वाद प्रकरणे, पराक्रम्य अभिलेख अधिनियमचे कलम १३८ खालील प्रकरणे, वाद पूर्व प्रकरणे इत्यादी खटले तडजोडीसाठी ठेवण्यात आली आहेत. ही सर्व प्रकरणे आपअपसातील तडजोडीद्वारे निकाली काढता यावीत. यासाठी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीचा जास्तीत जास्त पक्षकार मंडळींनी उपस्थित राहून फायदा घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष टी. एस. अकाली, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. एस. आर. भुक्तर यांनी केले आहे.

# जुन्या वादातुन राजुरा येथे तरुणाचा खून

**तभा वृतसेवा**
**मुक्रमबाद, दि. ५ डिसेंबर-**

जुन्या भांडणाचा वाद घालीत राजुरा येथे जत्रेत आलेल्या अंबुलगा येथील तरुणांच्या पोटात खंजीर घालून खून करण्यात आल्याची घटना दि.३ डिसेंबर रोजी संध्याकाळी ७-३० वाजता घडली असून या जखमी तरुणाचा उपजिल्हा रुग्णालय मुखेड येथे उपचार दरम्यान मृत्यू झाला.याप्रकरणी दोघांविरुद्ध मुक्रमाबाद पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मुखेड तालुक्यातील अंबुलगा येथील मयत राहुल संतोष येरगे वय वर्ष १७ हा तरुण क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले महाविद्यालय राजुरा येथे इयत्ता बारावी शाखेत शिक्षण घेत होता याच शाखेतील प्रथमेश उर्फ आदीनाथ जंगमवार व मंगेश माधवराव इंगळे रा.राजुरा या दोन तरुणांचा गेल्या चार महिन्यापासून शुल्लक कारणावरून सतत वाद होत होता हा वाद भांडणाच्या विकोपाला गेला होता.सध्या राजुरा येथे खंडोबाची यात्रा सुरू असल्यामुळे अंबुलगा येथील राहुल संतोष येरगे हा आपल्या दोन मित्रासोबत देवदर्शन करण्यासाठी राजुरा येथील जत्रेला गेला होता.

योगायोग जत्रेतील मंदिरासमोर त्याच्याच शाखेतील दोन तरुणांची भेट झाली यात बाचाबाची सुरू झाली भांडणाचे रूपांतर फारच विकोपाला गेले यात जुन्या भांडणाचा वाद घालून राहुल येरगे या तरुणांला मंदिर शेजारी रोडवर नेऊन राजुरा येथील दोन तरुणांनी खंजीर काढून राहुल येरगे यांच्या पोटात खुपसून गंभीर जखमी केले व तेथून पसार झाले. त्यानंतर त्यांच्या नातेवाईकांनी शासकीय रुग्णालय मुखेड येथे दाखल केले असता उपचार दरम्यान तरुणाचा मृत्यू झाला होता.

काही वेळ यात्रेत तणावाचे वातावरण पसरले होते. वेळीच मुक्रमाबाद पोलीसांनी बंदोबस्त लावून वातावरण शांत केले.मयत तरुणांचे वडील संतोष व्यंकटराव येरगे यांच्या फिर्यादी वरुन दि. ४ रोजी संध्याकाळी मुक्रमाबाद पोलिस स्टेशन मध्ये आरोपी प्रथमेश उर्फ अदिनाथ आंनदराव जंगमवार व मंगेश माधवराव इंगळे व आदी मित्र रा. राजुरा यांच्या विरुद्ध खुणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील दोन आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सपोनि राजेश चव्हाण हे करीत आहे.

# राजुरा येथे खंडोबा यात्रेनिमित्त रंगला कुस्त्यांचा सामना

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. ५ डिसेंबर-**

महाराष्ट्रांच्या विविध ग्रामीण भागातील खेड्यात आता यात्रा महोत्सवाला सुरुवात झाली असून ग्रामीण भागातील लोकांना यात्रा म्हणजे एक पर्वणीच असते.

खेळणे , मिठाई , कटलेरी, हाटेल, अंगाशी पाळणे , चक्कर गन्ना, मनोरंजन अशी कितीतरी दुकाणे थाटली जातात प्रत्येकाने आपल्या परिने यात्रेचा आनंद घेत असतो . यात्रा म्हटले की येथे जंगी कुस्त्यांचा सामना पहावयास मिळतोच.



असाच कुस्ती सामना मुखेड तालुक्यातील मौजे राजुरा बुद्रुक येथे दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी पहावयास मिळाला आहे. राजुरा बुद्रुक येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही श्री खंडोबा यात्रेनिमित्त जंगी कुस्त्यांचा सामना ठेवण्यात आला होता.

यात्रेचे मानकरी गंगाधर पाटील इंगळे,याच्या वतीने दरवर्षी कुस्तीचे नियोजन केले जाते. यावेळी सुध्दा यांच्या नियोजनाखाली जंगी कुस्त्यांचा सामना मोठ्या उत्साहात पार पडला असुन यावेळी सरपंच शिवदास राऊत ,उपसरपंच हाणमंतराव पाटील झरे,साहेबराव मामीलवाड, बाबुराव जाधव,पोलीस पाटील शिवाजी इंगळे,प्रदिप पाटील इंगळे,सुधाकर पाटील, खंडू राजुरे सखाराम पाटील, दत्ता भंडारे,मारोती जंगमवाड, पत्रकार माधव जंगमवाड व गावातील ज्येष्ठ मान्यवर, नवतरुण मित्र मंडळी व नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते .

# निळा येथे गांजाची शेती; २ लाखांचा गांजा जप्त

**तभा वृतसेवा**
**सोनखेड , दि. ५ डिसेंबर-**

लोहा तालुक्यातील निळा येथे गांजाची शेती करणाऱ्या आरोपीस पोलिसांनी अटक करुन १९ किलो वजनाचा १ लाख ९४ हजार रुपयांचा गांजा स्थानिक गुन्हा शाखेने जप्त केला आहे.



पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय आणि त्यांचे सहकारी साईनाथ पुयड यांच्या पथकाला काही गोपनिय माहिती मिळाली. त्यानुसार निळा ता.लोहा येथे कापसाच्या शेतात गांजाची झाडे लावून शेती करत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार कंधारचे पोलीस व नांदेड स्थानिक गुन्हा शाखेचे पथक निळा शिवारात धडकले. त्यांना शेतात गांजाची झाडे लावली असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार शिवाजी गणपत डांगे (४०) रा.निळा ता.लोहा यास ताब्यात घेतले व त्यास अटक केली. पोलिसांनी १९ किलो वजनाचा एक लाख ९४ हजार रुपयांचा गांजा जप्त करुन आरोपीविरुध्द सोनखेड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# हदगाव येथे वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यावर कारवाई

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ५ डिसेंबर-**

नांदेड पोलिसांनी वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या दहा जणांवर कारवाई केली असून, मिशन निर्भया अंतर्गत सदरची कारवाई करण्यात आली.

हदगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत तामसा टी पॉइंट जवळ नई आबादी व वाजपेयनगर येथे काही इसम महिलाकडून बळजबरीने वेश्या व्यवसाय करुन घेत आहेत. त्यावरुन हदगाव व तामसा पोलिसांनी एकत्रितपणे सापळा रचला व बनावट ग्राहक पाठवून याची खात्री केली. पोलिसांनी या दोन्ही नगरामधून दहा जणांना अटक केली असून, त्यात पाच महिलांचा समावेश आहे. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या निर्देशानुसार पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम व सहायक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांनी हि कारवाई केली.

## काँग्रेसच्या जिल्हा सरचिटणीसपदी डॉ. मधूकर राठोड

**नायगाव** -नायगांव तालुक्यातील मरवाळी तांडा हा छोटासा परंतु सामाजिक,शैक्षणिक आणि राजकीय जाणिव वांनी परिपूर्ण असा परिसर आज अभिमानाने उजळला आहे. अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या नांदेड जिल्हा सरचिटणीस या महत्त्वपूर्ण पदावर मरवाळी तांड्याचे सरपंच, माध्यमिक आश्रम शाळा संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि मरवाळी तांडा येथील माध्यमिक आश्रमशाळेचे कार्यवाहक डॉ. मधूकर राठोड यांची निवड होताच संपूर्ण जिल्ह्यात उत्साहा चे वातावरण निर्माण झाले आहे. काँग्रेस पक्षाशी दशकानुदशके निष्ठेने जोडलेले असलेले डॉ. राठोड यांनी ग्रामीण वाडीतांड्यांपर्यंत पक्षाची विचारधारा पोहोचविण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या प्रामाणिक कार्याची, जनसंपर्कातील प्रामाणिकतेची आणि समाज सेवेच्या दांडग्या परंपरेची दखल घेत पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर जिल्हा सरचिटणीस पदाची जबाबदारी सोपविली.ही बातमी समजताच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.विशेषत:मरवाळी तांडा माध्यमिक आश्रम शाळेत तर आनंदाचा उत्स्फूर्त जल्लोष दिसून आला. शाळेचे प्राचार्य डॉ. विजयकुमार देशमुख, शिक्षक सूर्याकांत जाधव, आनंदराव सूर्यवंशी, धोंडीबा तेलंग, संभाजी मेहेत्रे, नागनाथ येल्लूरे, सुभाष राठोड, सुरेश पवार, मुजमिल शेख तसेच पोस्ट बेसिकचे प्राध्यापक हेमंत बावणे, पांडुरंग येवले, दिलिप गोरे, उच्च माध्यमिक ज्युनिअर कॉलेजचे गणेश मारताळे कर, दिलीप माने, प्रदीप लाभशेटवार, शिवशंकर कोरे, सुभाष कदम, शिवराम राठोड, चिलवाड आणि शरद पवार ,राम पांचाळ यांच्यासह सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी डॉ. राठोड यांचा पुष्पहार घालून सत्कार केला व पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. वाडीतांड्यांतील बहुजन समाजात आपल्या मातीतून जिल्हा पातळीवर नेतृत्व घडले या अभिमानभावनेची लहर उसळली आहे. ग्रामीण समाजाच्या अपेक्षा, समस्यांचा निराकरण आणि समाजाभिमुख कार्याला डॉ. मधुकर राठोड आगामी काळात नवे बळ देतील, अशी आशा नायगांव तालुक्यातील ग्रामीण भागातील व वाडी तांड्या वरील नागरिकांनी यावेळी भावना व्यक्त केली आहे.



## रब्बी हंगाम २०२५-२६ प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

**नांदेड** -रब्बी हंगाम २०२५-२६ साठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेची नोंदणी सुरु झाली आहे. शेतकऱ्यांमध्ये पीक विम्याबाबत जागरूकता वाढावी आणि सहभाग वाढावा यासाठी १ ते ७ डिसेंबर दरम्यान १० वा पीक विमा सप्ताह राबविण्यात येत आहे. यानंतरही संपूर्ण डिसेंबर महिनाभर नोंदणी मोहीम सुरू राहणार आहे, शेतकऱ्यांनी या योजनेत अधिकाधिक सहभाग नोंदवावा असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी केले आहे. शेतकऱ्यांना रब्बी हंगाम २०२५-२६ मधील पीक विमा योजनेत गहू (बागायत), हरभरा, रब्बी कांदा या तीन अधिसूचित पिकांसाठी १५ डिसेंबर, २०२५ पर्यंत सहभागी होता येणार आहे. पीक विमा योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होणे ऐच्छिक आहे. या योजनेत नोंदणीसाठी https://pmfby.gov.in हे राष्ट्रीय पीक विमा पोर्टल कार्यान्वित करण्यात आले. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून छत्रपती संभाजीनगर कृषी विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना या जिल्ह्यांत भारतीय कृषी विमा कं. लि. व बीड जिल्ह्यात आय.सी.आय.सी.आय. लोंबार्ड इं. कं. लि. या कंपनीमार्फत या ही योजना राबविण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी गहू (बागायत) ४५००० रु. (३३७.५० रु.), हरभरा- ३६००० रु. (२७०रु.), रब्बी कांदा- ९०००० रु. (६७५रू.), जालना जिल्ह्यासाठी गहू (बागायत) ४५००० रु. (४५० रु.), हरभरा- ३६००० रु. (३६०रु.), बीड जिल्ह्यासाठी गहू (बागायत) ४५००० रु. (६७५ रु.), हरभरा- ३६००० रु. (५४०रु.), रब्बी कांदा- ७५००० रु. (११२५रू.) अशी जिल्हा व पीकनिहाय विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टरी विमा हप्ता शेतकऱ्यांनी भरावयाची आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी, फार्मर आयडी, आधार कार्ड, बँक खाते तपशील, जमीन धारणा उतारा (८-अ उतारा), भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना नोंदणीकृत भाडेकरार आदी कागदपत्रे आवश्यक असून ई-पीक पाहणी करणे बंधनकारक आहे.

## यशवंत सोनकांबळे यांचे निधन

**नरसी**-नरसी येथील रहिवासी व अर्धापूर येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीत निम्नस्तर लिपिक म्हणून कार्यरत असलेले यशवंत भगवानराव सोनकांबळे (वय ४७) यांचे दिनांक ४ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता निधन झाले. त्यांच्या जाण्याने नरसी तसेच महावितरण विभागात शोककळा पसरली आहे. यशवंत सोनकांबळे यांच्या पार्थिवावर दि. ५ डिसेंबर रोजी दुपारी १.३० वाजता नरसी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, आई असा परिवार आहे. समाजात अतिशय मनमिळाऊ व मदतीस तत्पर म्हणून ओळख असलेल्या सोनकांबळे यांच्या निधनाने गावात हळहळ व्यक्त होत आहे.





# भायेगाव येथील महादेव मंदिराच्या रस्त्याच्या कामांचा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ डिसेंबर-**

भायेगाव येथे महादेव मंदिराकडे जाणारा व शेतकरी बांधवांसाठीचा रस्ता आजपर्यंत अनेक आमदारांनी घोषणा करुनही झाला नव्हता. मात्र आमदार होताच आनंद पाटील बोंढारकर यांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. ना. हेमंत पाटील व आ. आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांचे सरपंच प्रतिनिधी बालाजी पा.खोसडे, व भायेगाव वाशी यांनी मानले आभार भायेगाव येथील गोदावरी नदीच्या काठी असलेल्या महादेव मंदिर नदीकाठी असलेल्या रस्त्यासाठी आ. आनंदराव बोंढारकर यांनी ४० लक्ष रुपयाचा निधी दिला होता.आज दि.४ डिसेंबर रोजी महादेव मंदिर ते भायेगाव या रस्त्याच्या कामांच्या शुभारंभ प्रसंगी नांदेड दक्षिणचे आ. आनंद बोंढारकरांचे बंधू रामराव तिडके यांच्या हस्ते कामास सुरुवात करण्यात आले यावेळी सरपंच प्रतिनिधी बालाजी पाटील भायेगावकर, उपसरपंच बालाजी कोल्हे, अशोक पा.कोचार , गंगाधर पा.खोसडे, विठ्ठल पा.खोसडे, प्रभू पा.कोल्हे, उत्तम पा.कोल्हे, पांडुरंग पा.कोचार, विश्वाबंर पा.कोचर, नारायण पा.कोल्हे, प्रभाकर पा.बोढारकर, गुत्तेदार अमित चिरकुले यांच्या सह गावातील जेष्ठ नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाळेची जागा वाचविण्यसाठी खाजगी वकील लावण्याची परवानगी द्यावी: डॉ.वैष्णवी पुजरवाड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ डिसेंबर-**

दानपत्रात शाळेसाठी देण्यात आलेली जागा वंशज पुन्हा मागणी करत असून, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या प्रकरणात शाळा वाचविण्यासाठी खाजगी वकील लावण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी डॉ.वैष्णवी पुंडलिक पुजरवाड यांनी एका निवेदनाव्दारे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

धर्माबाद शहरापासून जवळच असलेल्या रत्नाळी जिल्हा परिषदेची केंद्रीय प्राथमिक शाळा असून, या शाळेसाठी जवळपास १९५० मध्ये दानपत्राव्दारे जागा देण्यात आली होती. परंतु ज्यांनी जागा दान केली त्यांचे वंशज आता या जागेवर दावा करत आहेत. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून या प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने शाळेच्या बाजूने निकाल दिला होता. परंतु यानंतर या विरोधात वंशजांनी वरिष्ठ न्यायालयात अर्ज केल्यानंतर न्यायालयाने शाळेच्या विरोधात निर्णय दिला. हे प्रकरण आता उच्च न्यायालयात समाविष्ठ करण्यासाठी सरकारी वकील न देता खाजगी वकील देण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी रत्नाळी येथील गावकऱ्यांनी केली आहे. रत्नाळी येथे दुसरी कुठलीही शाळा नसून शाळेसाठी तीन किलोमीटर दूर जावे लागते. यामुळे विद्यार्थ्यांची पायपीट तसेच शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता असल्याने उच्च न्यायालयात हे प्रकरण लढण्यासाठी खाजगी वकील लावण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी गावकऱ्यांमार्फत डॉ.वैष्णवी पुजरवाड यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.

# विभागीय लोकशाही दिनाचे ८ डिसेंबर रोजी आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ डिसेंबर-**

विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी ८ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे.

तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्विकारण्यात येणार आहेत. अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही. जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत.

# मध्यवर्ती बसस्थानकातुन महिलेचे दागिणे लंपास

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ डिसेंबर-**

शहरातील मध्यवर्ती बसस्थानकातून गावी कळमनुरीकडे जाण्यासाठी निघालेल्या एका महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्यांनी तब्बल ९ लाख २१ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची गंभीर घटना १ डिसेंबर रोजी दुपारी घडली.

सविता रवी शिंदे (रा. धानोरा, ता. कळमनुरी) या दुपारी सव्वा दोन वाजताच्या सुमारास कळमनुरीला जाण्यासाठी बसस्थानकात आल्या होत्या. तेव्हा नावाची पाटी नसलेली बस आल्याने त्या बस कुठे जात आहे, याची विचारणा करण्यासाठी दरवाजाजवळ गेल्या. यावेळी बसमध्ये चढण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. ती बस कळमनुरीला जात नसल्याचे कळल्यावर त्या गर्दीतून बाहेर पडत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समध्ये ठेवलेली सोन्याचे दागिने लंपास केले. याप्रकरणी वजिराबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मात्र, गुन्हा दाखल होऊन तीन दिवस उलटले तरी वजिराबाद पोलिसांनी या प्रकरणात कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याने, सदर महिलेचे पती ॲड. रवी शिंदे यांनी हा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्याची मागणी करत आरोपी शोध न लागल्यास पोलिस उपोषण करण्याचा इशाराही दिला.

# प्रशिक्षणार्थी निवड करताना शुल्क आकारू नये

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ डिसेंबर-**

जिल्हयातील सर्व शासकिय, निमशासकिय तसेच खाजगी आस्थापनांनी त्यांचे आस्थापनेवर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून प्रशिक्षणार्थी घेताना किंवा निवड करताना त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क, फी, रक्कम आकारण्यात येवू नये. असे निर्दशनास आल्यास संबंधीत आस्थापनेवर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त डॉ. रा.म. कोल्हे यांनी केले आहे.

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या ९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्राचे रहीवाशी असलेल्या १८ ते ३५ वर्ष वयोगटातील युवकांना शासकिय, निमशासकिय, खाजगी आस्थापनात ११ महिन्यासाठी कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यास अनुसरुन नांदेड जिल्ह्यातील सर्व शासकिय, निमशासकिय तसेच खाजगी आस्थापनांना याद्वारे कळविण्यात येते की मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत संबंधीत आस्थापनेत प्रशिक्षणार्थी घेण्याबाबतची प्रक्रिया ही निःशुल्क असून कोणत्याही प्रकारची शुल्क, फी, रक्कम शासनामार्फत आकारण्यात येत नाही, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी दिली आहे.

# असर्जन येथे इन डोअर स्टेडियम उभारा ; क्रीडामंत्री कोकाटे यांच्याकडे आ.बोंढारकर यांची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ डिसेंबर-**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे , क्रीडा क्षेत्रात नांदेड जिल्ह्याचा नावलौकिक व्हावा , तरुणांचे आरोग्य उत्तम राहावे ,यासाठी आसर्जन येथे २५ एकरवर इन डोअर स्टेडियम उभारण्यात यावे अशी मागणी आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे केली आहे.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे ना. माणिकराव कोकाटे दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनासाठी आले आसता यावेळी आ. बोंढारकर यांनी त्यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले आहे.

सद्यस्थितीतमहानगरपालिकेच्या मालकीची स्टेडियम परिसरात जागा शिल्लक नसल्यामुळे अद्यावत क्रीडा सुविधा निर्माण करण्याकरिता महापालिकेची जागा अपुरी आहे. त्यामुळे जिल्हा क्रीडा संकुलाकरिता माझ्या मतदारसंघा मधिल मौ. असर्जन (कौठा) ता.जि. नांदेड येथील २५ एकर जागा जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या नावे करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, नांदेड यांनी विभागीय आयुक्त, छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांचे कार्यालयामार्फत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन शासनाकडून जागा प्राप्त करून घेण्याकरिता शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असून मान्यतेची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.सद्यस्थीतीत जिल्हा क्रीडा संकुल समितीकडे जागा उपलब्ध नसल्यामुळे अनेक प्रकारचे अद्यावत राज्य व राष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा निर्माण करता आलेल्या नाहीत. त्यामुळे जिल्हा क्रीडा संकुला करीता नव्याने मौ. आसर्जन (कौठा) ता.जि.नांदेड येथील सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांचे ताब्यात असलेली गट क्रं. १११,११२, ११३, व ११४, ११५ संदर्भात फेर मोजणी करुन २५ एकर जागेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या कडून मा. विभागीय आयुक्त, छ. संभाजीनगर यांच्या मार्फत मा.अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आला आला असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच लवकरात लवकर मंत्रालयात यासाठी क्रीडामंत्री कोकाटे यांनी बैठक बोलवण्याचीही सांगितले आहे..

# आंतर राज्य क्रीडा महोत्सव: बॅडमिंटन स्पर्धेत रोमांचक सामने

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ डिसेंबर-**

स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सुरू असलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ च्या दुसऱ्या दिवशी बॅडमिंटन मुली व मुलांच्या गटात रोमांचक सामन्यांनी उत्साहाचे वातावरण रंगतदार झाले.

मुलींच्या गटात झालेल्या सामन्यांमध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक यांच्यावर सरशी साधत दिवसाची विजयी सुरुवात केली. त्यानंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी उत्कृष्ट कामगिरी करत होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई यांना पराभूत केले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी दमदार खेळ सादर करत कवी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांना मात दिली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांचा पराभव करत विजय नोंदवला.

यानंतर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांनी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांना हरवत यश मिळविले. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा पराभव तर एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांनी छत्रपती संभाजीनगर विद्यापीठ संघावर विजय मिळवला.

मुलांच्या गटातही तितकेच चुरसपूर्ण सामने पार पडले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना पराभूत केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांनी संघर्षमय सामन्यात कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांचा पराभव केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी अमरावती विद्यापीठ यांच्यावर उल्लेखनीय विजय मिळवला. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यावर मात करून पुढे मजल मारली.

मुंबईतील दोन संघांमध्ये झालेल्या सामन्यात मुंबई विद्यापीठ यांचा डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ यांच्यावर विजय झाला. तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना पराभूत करत सामन्याची सांगता विजयाने केली.

क्रीडांगणात दिवसभर सर्व संघांनी शिस्तबद्ध खेळ, ऊर्जस्वल स्पर्धा आणि खेळाडूपणाचा उत्तम प्रत्यय देत उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले.